महाराष्ट्र विधानपरिषद

तिसरे अधिवेशन, २०१७

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१७ / श्रावण ११, १९३९ (शके)

(१) मुख्यमंत्री
(२) गृहनिर्माण मंत्री
(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ९०

टेम्पल रोझ रियल इस्टेट प्रा.लि.कंपनीने हजारो गुंतवणुकदारांची फसवणूक केल्याबाबत

(१) * ३२३५० श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक २८०६४ ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेम्पल रोझ रियल इस्टेट प्रा.लि. कंपनीने स्वत:च्या नावावर जमीन नसतानाही ४५० एकर जमिनीची खोटी कागदपत्रे दाखवून पुणे, मुंबई व ठाणे येथील सुमारे चार हजार नागरिकांची कोटयवधी रुपयांची फसवणूक केल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार हजारो गुंतवणुकदारांची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व गुंतवणुकदारांचे पैसे त्यांना परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी ६ आरोपींविरूद्ध भोईवाडा, पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ११/२०१७, आर्थिक गुन्हे विभाग गुन्हा नोंद क्रमांक ०८/१७ भादंवि कलम ४०९, ४२०, १२० (ब) सह कलम ३, ४ एम.पी.आय.डी. ॲक्ट व ३, ४, ५ पी.सी.एम.बी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासावर आहे.

तसेच चतुश्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं. २७५/२०१७ भादंवि कलम ४०९, ४२०, ४६७, ४६८, १२०(ब), ३४ महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम कलम ३, ४ व प्राईज चिट ॲन्ड मनी सर्क्युलेशन (बर्निंग) ॲक्ट कलम ३, ४ व ५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयातील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हा तपासावर आहे.

सदर प्रकरणी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ५ अन्वये सक्षम प्राधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असून सदर कायद्याच्या कलम ४ अन्वये जप्त केलेली मालमत्ता अधिसूचित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बांधकाम कंपन्यांकडून मिळणाऱ्या सेसचा वापर बांधकाम मजुरांच्या कल्याणासाठी होत नसल्याबाबत

(२) * ३०९५६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांधकाम मजुरांच्या कल्याणासाठी सन १९९६ पासून बांधकाम कंपन्यांकडून बिल्डिंग कन्स्ट्रक्शन सेस म्हणून वसूल करण्यात आलेले २० हजार कोटी रुपयांचा हिशोब कॅगलाही मिळत नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फंडाचा वापर बांधकाम मजुरांच्या कल्याणासाठी होत नसल्याने या फंडाचा प्रशासनाकडून गैरवापर होत आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली आहे ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वसई (जि.पालघर) येथे स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

(३) * ३४०१२ श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथे स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, कोकण भवन, नवी मुंबई यांच्या कार्यालयात दिनांक १ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई यांनी दिनांक ०१/०३/२०१७ च्या पत्रान्वये मिरा-भाईंदर व वसई-विरार परिसराकरीता मिरा-भाईंदर आयुक्तालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयास सादर केला होता. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदरहू प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

आमखेडा (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थीनीचा मृत्यू झाल्याबाबत

(४) * ३१०८० श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमखेडा (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील कृषी महाविद्यालयात व्दितीय वर्षाला शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनीचा दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास महाविद्यालयाच्या परिसरात मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थीनीच्या मृतदेहाचे जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम येथे शवविच्छेदन करण्यापूर्वी वाशिम शहर पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात येऊन इन्क्वेस्ट पंचनामा करतेवेळी जऊळका पोलीस स्टेशनचे ठाणेदार उपस्थित होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गंभीर प्रकरणी दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी जऊळका पोलीस स्टेशन मध्ये एफआयआर दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कार्यवाही करणेबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त गंभीर प्रकरणाची दखल घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही,

ठाणेदार जऊळका हे बैठकीकरीता वाशिम येथे हजर असल्याने व सदरचे प्रकरण हे पोलीस स्टेशन जऊळका (जि.वाशिम) यांचे हद्दीतील असल्याने, त्यांना सदर प्रकरणाची माहिती मिळाल्यामुळे ते जिल्हा सामान्य रूग्णालय, वाशिम येथे गेले होते. सदर ठिकाणी मृतकाचे नातेवाईकांना भेटून कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत आश्वस्त केले व त्यानंतर ते तेथून रवाना होऊन पोलीस स्टेशन जऊळका येथे गेले. त्यानंतर पोलीस स्टेशन वाशिम शहर येथील महिला पोउपनि नम्रता राठोड यांनी सदर मृतकाचा इन्क्वेस्ट पंचनामा केला व त्यांचे समक्ष पी.एम. करण्यात आले.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नाही. तक्रारदाराने मा.मुख्यमंत्री, तेलंगणा राज्य यांना दिनांक २६/४/२०१७ रोजी सादर केलेला तेलगू भाषेतील लेखी अर्ज केला आहे. सदर अर्ज पोलीस आयुक्त निजामाबाद, तेलंगणा मार्फत पोलीस अधिक्षक, वाशिम यांना प्राप्त झाला आहे.

(५) पोलीस स्टेशन जऊळका येथे ११ आरोपींच्या विरोधात अप नं. ९२/२०१७ कलम ३०२, २०१, ३५४, ३५४ अ, ३७६(२)(फ), ३७६ (क), ३७६(ड), १४३, १४७ भादंवि सहकलम ३(२)(v), ३(२)(va), ३(i)(w)(ii) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक सुधारणा अधिनियम, २०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हा तपासावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

सक्करदरा, नागपूर येथील महिलेची नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत

(५) * **३३४५७ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सक्करदरा, नागपूर येथील ४० वर्षीय महिलेची नोकरीचे आमिष दाखवून दोन लाखांत विक्री करुन सौदी अरेबियात पाठविण्याचा कट रचत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सक्करदरा पोलिसांनी पाच ते सहा जणांवर गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी काय निष्पन्न झाले आहे, मुख्य सुत्रधार पोलिसांच्या हाती सापडला आहे काय व याबाबत पोलिसांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) फिर्यादीचे रिपोर्टवरून सक्करदरा पोलीस स्टेशन मध्ये ५ आरोपीविरूध्द अप क्र १६४/१७ कलम ४२०, ३७०, ३४२, ३७४, ३२३, ३२४, ५०४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

आरोपी क्र. १ हिचा तातडीने शोध घेण्यात आला असता ती मिळून आली नाही. परंतू तीने मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे केलेल्या अर्जावर तिला अंतरिम जामिन मंजूर करण्यात आला आहे. अन्वेषण अधिकारी यांनी जामिन रद्द होण्यासाठी मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. आरोपी क्र. २ याचा मुंबई येथे शोध घेण्यासाठी मुंबई येथे पथक पाठविण्यात आले होते. परंतू आरोपी मिळून आलेला नाही. आरोपी क्र.३, ४ व ५ हे सौदी अरेबिया येथे राहत असल्याने त्यांना सुध्दा अटक करावयाचे बाकी आहे. सध्या प्रकरण तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील रेल्वे हद्दीतील झोपडीधारकांना हक्काची घरे देण्याबाबत

(६) * ३१४७५ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रेल्वे हद्दीतील झोपडीधारकांना हक्काची घरे देण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) व (२) मा.मुख्यमंत्री व मा.केंद्रीय मंत्री यांच्या दरम्यान दि.१८/४/२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये रेल्वेच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडीधारकांच्या पुनर्वसनाच्या धोरणाबाबत मुद्दा चर्चेस होता. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी सरव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांच्याशी संपर्क साधून रेल्वेच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडीधारकांचे पुनर्वसन संयुक्तपणे करण्यासाठी रेल्वे मंत्रालय व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्यामध्ये संयुक्त उपक्रम (J.V.) स्थापण्याबाबत व्यवहार्यता तपासण्याचे व त्यासाठी सरव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांच्याशी संपर्क साधून पुढील कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाबाबत

(७) * ३३४२२ श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथे उभारावयाच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाच्या निविदेला शासनाची मंजुरी न मिळाल्याने काम प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर विमानतळाचे काम पूर्ण व्हावे म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून (PPP) विकास करण्यात येत असून जागतिक बोली प्रक्रियेद्वारे योग्य भागीदाराची निवड करण्याच्या अनुषंगाने विमानतळ विकासाशी संबंधित प्रारुप निविदा टप्प्यातील दस्तऐवजांना व करारनाम्यांना शासन निर्णय दि.२७ एप्रिल, २०१६ नुसार मान्यता देण्यात आली आहे.

याकरिता सुरु करण्यात आलेल्या बोली प्रक्रियेमध्ये दि.१३/२/२०१७ रोजी दोन बोली प्राप्त झालेल्या असून त्यास प्रकल्प व्यवस्थापन आणि अंमलबजावणी समितीची (PMIC) मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

धारावी, मुंबई येथील महानगरपालिकेच्या तामिळ शाळेचे बांधकाम करणेबाबत

(८) * ३१४८७ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी, मुंबई येथील महापालिकेच्या तामिळ शाळेचे बांधकाम करणे आवश्यक असताना केवळ नुतनीकरण करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेच्या इमारतीची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर शाळेचे केवळ नुतनीकरण न करता पुन्हा बांधकाम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) दिनांक २२/०६/२०१६ रोजीच्या "पुढारी" या दैनिक वृत्तपत्रात "धारावीत पालिकेची शाळा विद्यार्थ्यांसाठी धोकादायक" अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

तथापि, महानगरपालिकेमार्फत जुलै, २०१६ मध्ये करण्यात आलेल्या पाहणीमध्ये सदर कन्नडी चाळ महानगरपालिका शाळेची तातडीने दुरुस्ती करण्याची गरज असल्याचे आढळून आले आहे.

(३) व (४) सदर शाळेच्या पाहणीच्या निष्कर्षानुसार शाळेच्या इमारतीची दुरुस्ती, पुनर्वसन व दर्जोन्नतीच्या कामासाठी महानगरपालिकेमार्फत कंत्राटदारास दिनांक ०९/०१/२०१७ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सद्य:स्थितीत सदर इमारतीचे काम ५०% पूर्ण झाले असून, उर्वरित काम दिनांक ३०/०९/२०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

भायखळा (मुंबई) येथील महिला कारागृहातील गैरप्रकारांबाबत

(९) * **३३९९७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील महिला कारागृहात मंजूळा शेट्ये या महिला कैद्यास कारागृह प्रशासनाने विवस्त्र करुन अमानुष मारहाण केली त्यात तिचा उपचाराअभावी मृत्यू झाला असल्याची घटना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त महिला कैदी कारागृहातून बाहेर आल्यावर तेथील अनेक गैरव्यवहारांची व गैरप्रकारांची माहिती जनतेसमोर येईल या भितीने शेट्ये यांना अमानुष मारहाण करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कारागृहात होत असलेल्या अनेक गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी व अशा प्रकारांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कारागृह प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) महिला बंदी मंजुळा शेटये हिचे मृत्यूप्रकरणी नागपाडा पोलीस स्टेशन येथे भा.दं.वि.३०२, सह ३४ गुन्हा रजिस्टर क्र.२६३/१७ दाखल करण्यात आला असून, सहा महिला अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक ०१/०७/२०१७ रोजी अटक करण्यात आलेली आहे व याबाबत मुंबई पोलीस गुन्हे शाखा तपास करीत आहे.

(३) व (४) शिक्षाबंदी मंजुळा शेटये हिचे मृत्यू प्रकरणाचा तपास गुन्हे प्रकटीकरण शाखा, युनिट क्रमांक-३, मुंबई हे करीत आहेत व याबाबत प्रशासकीय चौकशी विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई-०८ हे करीत आहेत. सदर प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या महिला अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आलेले आहे व त्यांना उक्त गुन्ह्याकरिता दिनांक १/७/१७ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी मा.राज्य महिला आयोगाने तीन सदस्यांची चौकशी समिती नेमली आहे. त्यामध्ये एक निवृत्त न्यायमुर्ती, एक निवृत्त पोलीस अधिकारी व एक सामाजिक कार्यकर्ता यांचेमार्फत चौकशी सुरु आहे. महिला बंदी मृत्यू प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे फौजदारी जनहित याचिका क्र. १९/२०१७ दाखल करण्यात आली आहे. सदर महिला बंदी मृत्यूप्रकरणी फौजदारी प्रक्रिया संहिता (सीआरपीसी) १७६ (१)(अ) या कलमाप्रमाणे महानगरदंडाधिकारी यांचेमार्फत चौकशी होणार आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या "आपली चिकित्सा" या योजनेबाबत

(१०) * **३२३४०** **श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने "आपली चिकित्सा" या संकल्पनेतून महानगरपालिकेच्या १५० दवाखान्यांबरोबरच सर्व रुग्णालये, विशेष रुग्णालये, प्रसुतिगृहात वैद्यकीय चाचण्या सुविधा सुरु करण्याची योजना आखली असल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या केईएम, नायर आणि शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालय वगळता अन्यत्र वैद्यकीय चाचण्या होत नसल्याने खासगी प्रयोगशाळेत या चाचण्या कराव्या लागत असल्याने याकरिता रूग्णांची आर्थिक हेळसांड होत असल्याने प्रश्न भाग (१) मधील योजनेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत १७५ दवाखाने, २८ प्रसुतीगृहे, ५ विशेष रुग्णालयांमध्ये वैद्यकीय चाचणी सेवा बाह्यस्त्रोताद्वारे पुरविण्याचे योजिले असून त्यानुसार प्राथमिक व प्रगत चाचण्या "आपली चिकित्सा" या कार्यक्रमांतर्गत बाह्यस्त्रोतांद्वारे करण्याची योजना प्रस्तावित आहे.

(२) महानगरपालिकेच्या केईएम, नायर आणि लोकमान्य टिळक रुग्णालय येथे सर्व प्रकारच्या अद्ययावत वैद्यकीय चाचण्याची सुविधा २४ तास उपलब्ध आहे.

महानगरपालिकेच्या १६ उपनगरीय रुग्णालयांच्या प्रयोगशाळेत दोन सत्रांमध्ये प्राथमिक रक्तचाचण्या केल्या जातात. तथापि अतिविशिष्ट रक्तचाचण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने या चाचण्या करण्यासाठी रुग्णांना वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पाठविण्यात येते.

वैद्यकीय महाविद्यालयातील चिकित्सा विभागातील रक्त चाचण्यांचा ताण कमी करण्यासाठी व रुग्णांच्या सोयीसाठी "आपली चिकित्सा" ही संकल्पना प्रस्तावित असून वैद्यकीय सेवा पुरवठादारांची नियुक्ती करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेतर्फे कर्करोग रुग्णांसाठी रुग्णालय उभारण्याबाबत

(११) * **३१७६६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे टाटा मेमोरियल सेंटर या संस्थेच्या सहकार्याने ठाणे महानगरपालिकेतर्फे कर्करोग रुग्णांसाठी रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्करोग रुग्णालयासाठी ठाणे महानगरपालिकेने देऊ केलेल्या कोलशेत येथील भूखंडाप्रकरणी क्लारियंट कंपनीच्या विकासकांनी मा.उच्च न्यायालयात माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान याचिका दाखल केली असल्यामुळे कर्करोग रुग्णालयासाठी प्रस्तावित भूखंड ठाणे महानगरपालिकेने वितरित केला नसल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या सुविधा भूखंडासंदर्भात क्लोरियंट कंपनी विकासकाने कोणत्या आधारे न्यायालयात याचिका सादर केली आहे, तसेच सदर याचिका मा.उच्च न्यायालयाने दाखल करुन घेतली आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तावित सुविधा भूखंड जर अगोदरच वितरित केला होता तर त्याठिकाणी कर्करोग रुग्णालयासाठी जागा कोणत्या अधिकाऱ्याने प्रस्तावित केली व कोणत्या नियमाद्वारे केली आहे,

(५) तसेच, सदर भूखंडाऐवजी अन्य भूखंड कर्करोग रुग्णालयाकरिता आरक्षित करून कर्करोग रुग्णालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) व (३) होय.

ठाणे महानगरपालिकेने विकास आराखडा रस्त्याचे क्षेत्र (डी.पी.रोड) सुविधा भूखंडातून वगळले असून त्याविरुध्द म्हणजेच विकास आराखडा रस्त्याचे क्षेत्र (डी.पी.रोड), सुविधा भूखंडात समाविष्ट करण्याची मागणी करणारी याचिका विकासकामार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आली आहे. सदर याचिका प्रलंबित आहे.

(४) विकासकाने नियमानुसार मंजुर आराखड्यातील विहित सुविधा क्षेत्र महानगरपालिकेस द्यावयाचे असते. सदर प्रकरणी सुविधा क्षेत्र निश्चितीची बाब मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने अद्यापि, सदर सुविधा भूखंड वितरीत करण्यात आला नाही.

(५) व (६) सदर सुविधा भूखंडाऐवजी अन्य भूखंड कर्करोग रुग्णालयाकरीता ठाणे महानगरपालिकेमार्फत टाटा मेमोरियल सेंटर यांना सुचविण्यात आला आहे.

मेहुणबारे (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील अल्पवयीन मुलीच्या झालेल्या अपहरणाबाबत

(१२) * **३४२१८ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहुणबारे (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील अल्पवयीन मुलीच्या अपहरणाच्या घटनेस जवळपास ५० दिवस उलटूनही आरोपीस पकडण्यात आले नसल्याने तसेच मुलीचा तपास अद्याप लागला नसल्याने सदर मुलीच्या आई-वडीलांनी पोलीस स्टेशन समोर दिनांक २६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास किटकनाशक घेवून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय, तद्नुसार तपास करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अपहृत मुलीच्या आई वडीलांनी आत्मदहनाच्या इशाऱ्याबाबत दि.२४/०५/२०१७ रोजी निवेदन दिले होते. दि.२६/०५/२०१७ रोजी ते पोलीस ठाण्यासमोर आले असता त्यांच्या हातात किटकनाशक औषधाच्या बाटल्या आढळून आल्याने त्यांना त्वरीत ताब्यात घेण्यात आले. त्यांनी किटकनाशक प्राशन केलेले नव्हते.

(२) मेहुणबारे, ता.चाळीसगाव येथील अल्पवयीन मुलगी बेपत्ता असल्याबाबत दि. ०३/०४/२०१७ रोजी मेहुणबारे पोलीस ठाणे येथे मिसींग क्र. ०८/२०१७ नोंद करण्यात आली आहे. सदर मुलीस पळवून नेल्याबाबत मुलीच्या वडीलांनी दिलेल्या तक्रारीवरुन मेहुणबारे पोलीस ठाणे येथे भाग ५, गु.र.क्र. २९/२०१७ भादंवि कलम ३६३, ३६६, ३४ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर अपहृत मुलीचा विविध पोलीस तपास पथके निर्माण करुन संभाव्य ठिकाणे व भ्रमणध्वनी लोकेशन प्राप्त करुन शोध सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत

(१३) * ३१७०१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवजात बाळांच्या चोरीला आळा घालण्यासाठी मुंबई महापालिकेची रुग्णालये व प्रसुतीगृहांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याचा मा.उच्च न्यायालयाचा आदेश असताना अद्याप २६ पैकी १८ प्रसुतीगृहांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये १,६१२ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत त्यातील बहुतांश सन २०११ नंतर देखभाल न झाल्याने बंद अवस्थेत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन वर्षांची मुदत संपल्यानंतर सी.सी.टी.व्ही. कॅमे-यांच्या देखभालीसाठी नव्या कंत्राटदाराची नियुक्ती करणे अथवा त्याच कंत्राटदाराला मुदतवाढ महापालिकेद्वारे न दिल्यामुळे ११४ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार नवजात बाळांच्या चोरीला आळा घालण्यासाठी तसेच रुग्णालयातील रुग्णांच्या व डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी महानगरपलिकेच्या प्रसुतीगृहांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) सन २००९ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व १८ रुग्णालयांमध्ये तसेच ६ प्रसुतीगृहांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले होते, ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३), (४) व (५) महानगरपालिकेच्या १८ रुग्णालये व ६ प्रसुतीगृहांत सन २००९ मध्ये बसविण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. यंत्रणेच्या दोन वर्षांच्या हमी कालावधीनंतर पाच वर्षांचा परिरक्षण कालावधी सुरु होता. सदर कालावधी माहे ऑक्टोबर, २०१६ रोजी संपुष्टात आला आहे.

सन २०१४-१६ या कालावधीत बसविण्यात आलेल्या ३ प्रसुतीगृहांतील सी.सी.टी.व्ही. यंत्रणांचा परिरक्षण कालावधी अद्याप संपुष्टात आलेला नाही व सदर यंत्रणा सुरु आहे.

सन २०१६ मध्ये के.ई.एम. रुग्णालय, सायन रुग्णालय, नायर रुग्णालय व कुपर रुग्णालय या चार प्रमुख रुग्णालयांत नवीन सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

सी.सी.टी.व्ही. यंत्रणा नव्याने कार्यान्वित करण्यासाठी सर्वेक्षणाची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु असून डिसेंबर, २०१७ पर्यंत महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालये व प्रसुतीगृहांमध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

सदर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत महानगरपालिकेची १४ रुग्णालये व ६ प्रसुतीगृहांमधील तांत्रिकदृष्टया कालबाह्य झालेली सी.सी.टी.व्ही. यंत्रणा दुरुस्त करुन तात्पुरत्या स्वरुपात कार्यान्वित करण्यात आली आहे.

नालासोपारा येथे इंटरनेटवरील ॲपद्वारे बनावट कागदपत्रे बनवणा-यांना पोलिसांनी अटक केल्याबाबत

(१४) * **३३४८४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंटरनेटवरील ॲपद्वारे बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड, पारपत्र आणि इतर कागदपत्रे बनवणा-या तिघांना नालासोपारा येथे दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलिसांनी छापा टाकून अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी केली असून आरोपीविरुध्द तुळींज पोलीस ठाणे, येथे गु.र.क्र. २९०/१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ३४ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. या गुन्ह्यातील ३ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हा तपासाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

आष्टी (जि.बीड) येथील महानुभव आश्रमात दरोडेखोरांनी दरोडा टाकल्याबाबत

(१५) * ३३२२३ श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) येथील महानुभव आश्रमात दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास दरोडेखोरांनी दरोडा टाकला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गुन्हयाचा तपास पूर्ण केला आहे काय, त्यात किती आरोपींना अटक केली व त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन आष्टी येथे गु.र.नं. १७७/२०१७ भा.दं.वि. कलम ३९२, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा प्रकार हा दरोड्याचा नसून जबरी चोरीचा आहे.

(२) सदर गुन्हयाच्या तपासात ०१ आरोपीस अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून रु.२०,०००/- रोख रक्कम व १०००/- रुपयांचे चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. तसेच, उर्वरीत ०१ आरोपीस अटक करण्यावर सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(३) विलंब झालेला नाही.

केज (जि.बीड) येथे बनावट संस्था स्थापन करून बेरोजगार युवकांना नोकरीचे आमिष दाखवुन फसवणूक केल्याबाबत

(१६) * ३१३११ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साने गुरुजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या (ता.केज, जि.बीड) पदाधिकाऱ्यांनी सदरहू संस्था केंद्र शासनाशी संबधित असल्याचे भासवून सुमारे ५०० हून अधिक बेरोजगार युवकांची फसवणूक केल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फसवणूक झालेल्या युवकांनी संबंधितांना केज पोलिसांच्या ताब्यात देऊन कारवाईची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाचा उपक्रम असल्याचे भासवून बेरोजगार युवकांकडून पैसे घेणे, शासकीय विश्रामगृहाचा बेकायदेशीर वापर करणे, यासह वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बेरोजगारांची फसवणूक करणाऱ्या विरोधात पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) साने गुरुजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने अनेक बेरोजगार युवकांना सरकारशी संबंधीत असल्याचे भासवुन, शासकीय रुग्णालयात नोकरीचे आमिष दाखवून त्यांच्याकडून प्रत्येकी ५०० रुपये घेतले व नोकरीच्या मुलाखतीसाठी दि.३०/०४/२०१७ रोजी शासकीय विश्रामगृह, केज येथे सदर युवकांना बोलाविण्यात आले, परंतु सदर संस्थेच्या अध्यक्षास पोलीस स्टेशन, धारुर गु.र.नं. ९८/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, महाराष्ट्र व्यवसाय अधिनियम कलम ३३ व भारतीय चिकित्सा परिषद एम.एम.पी. अधिनियम कलम २ (२) या दाखल गुन्ह्यात दि.२९/०४/२०१७ रोजी अटक करण्यात आली असल्याने सदर आरोपी दि.३०/०४/२०१७ रोजी मुलाखतीस हजर राहू शकला नाही. त्यामुळे मुलाखतीसाठी आलेल्या युवकांना सदर संस्था ही बनावट असल्याचे व त्यांची फसवणूक झाल्याची लक्षात आले. परंतु सदर प्रकरणात फसवणूक झालेल्या उमेदवारांपैकी अद्यापपावेतो कोणीही सदर संस्थेविरुध्द तक्रार दिलेली नाही.

(४) विलंब झालेला नाही.

मुंबईत म्हाडाच्या संक्रमण शिबिरांच्या जमिनीवर पंतप्रधान आवास योजना राबविण्याबाबत

(१७) * **३२८२९ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत म्हाडाच्यावतीने तात्पुरत्या वास्तव्यासाठी बांधण्यात आलेल्या ३० संक्रमण शिबिरांच्या जमिनीवर पंतप्रधान आवास योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजना कोणकोणत्या ठिकाणी/शहरात राबविण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरूप काय, यावर अंमलबजावणी केव्हापर्यंत होण्याचे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१), (२) व (३) पंतप्रधान आवास योजनेंतर्गत संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या विद्युत विभागातील गैरव्यवहाराबाबत

(१८) * **३२१९१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या विद्युत विभागात जुन्या साहित्याचा गैरव्यवहार झाला असल्याचे लेखा परिक्षण अहवालातून माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे अंशत: खरे आहे.

मुख्य लेखा परिक्षक महानगरपालिका, औरंगाबाद यांनी सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षाकरिता केलेल्या विदयुत विभागाच्या लेखा परिक्षण अहवालात आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.
(२) या संदर्भात औरंगाबाद महानगरपालिकेमधील उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत लेखा आक्षेपांबाबत सखोल चौकशी करुन, चौकशीमध्ये दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास करणेबाबत

(१९) * ३१३८४ श्री.नारायण राणे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २८२५५ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी येथील बी.डी.डी. चाळ मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जमिनीवर असल्यामुळे चाळींना पुनर्वसन योजनेतून वगळण्यात आले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जमिनीचे धोरण निश्चित करुन शिवडी बी.डी.डी. चाळींचाही पुनर्विकास करण्यात यावा अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्ग, परेल येथील बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास म्हाडामार्फत रहिवाशांच्या संमतीशिवाय करण्यात येत असल्याने सदर पुनर्विकास प्रकल्पांबाबत अखिल भारतीय बी.डी.डी. चाळ आणि झोपडपट्टी बचाव कृतीमार्फत आंदोलनाचा इशारा माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार रहिवाश्यांची परवानगी घेऊन उपरोक्त बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) हे खरे नाही.

मुंबईतील बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत मा. मंत्रीमंडळाच्या दि. १७/०३/२०१६ च्या बैठकीत निर्णय घेण्यात आला असुन त्यानुसार बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि.३०/०३/२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. शिवडी येथील बी.डी.डी. चाळी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर असल्याने केंद्र शासनाकडुन सहमती प्राप्त झाल्यास त्या चाळींचा अंतर्भाव पुनर्विकास प्रक्रियेमध्ये करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

शिवडी येथील बी.डी.डी. चाळींखालील जागा ही मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या मालकीची असल्याने ती जागा प्रथम महाराष्ट्र शासनाच्या नावे करण्याच्या अनुषंगाने मुख्य सचिव यांच्यास्तरावरुन दि.२७/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सचिव, जहाज मंत्रालय, भारत सरकार व अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांना विनंती करण्यात आलेली आहे. तद्नंतर मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या दि.२३/०३/२०१७ च्या पत्रान्वये सदर चाळींचा पुनर्विकासाबाबतचा प्रस्ताव म्हाडाकडुन प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी निर्णय घेण्यात येईल असे कळविले आहे. त्या अनुषंगाने म्हाडाने शिवडी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत "सर्वांगिण सुसाध्यता अहवाल" (Feasibility Report) तयार करण्यासाठी वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार यांची दि.११/०५/२०१७ रोजी नियुक्ती केली आहे व पुढील कार्यवाही सुरु आहे असे म्हाडाने कळविलेले आहे.

(२) शिवडी येथील बी.डी.डी. चाळी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर असल्याने सदर चाळींचा समावेश पुनर्विकास प्रस्तावात घेण्यासाठी केंद्र शासनाकडुन सहमती प्राप्त झाल्यास त्या चाळींचा अंतर्भाव पुनर्विकास प्रक्रियेमध्ये करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) म्हाडा कार्यालयाने म्हाडा कार्यालयास असा कोणताही आंदोलनाचा इशारा प्राप्त झालेला नाही असे कळविलेले आहे.

सदर पुनर्विकास शासनाच्या मालकीच्या जमिनीवर करण्यात येत असुन त्या अनुषंगाने बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये स्वतंत्र विनियम ३३ (९) (ब) अंतर्भूत करण्यात आला आहे व त्यामध्ये रहिवाश्यांच्या संमतीची तरतुद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नवीन नगरपरिषदांच्या अखर्चित निधीस मुदतवाढ देणेबाबत

(२०) * **३४१६२ श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नवीन नगरपरिषदांच्या विशेष अर्थ सहाय्य योजनेंतर्गत सन २०१३-१४ मध्ये देण्यात आलेल्या अखर्चित निधीस मुदतवाढ देवून प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी नगरविकास राज्यमंत्री यांचेकडे यवतमाळचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.
(२) अखर्चित निधी विनियोगाबाबत वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ अन्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच दिनांक ३० जून, २०१७ रोजीच्या आदेशान्वये अखर्चित निधीबाबतच्या सूचनाचा पुनरुच्चार केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागपूर येथील भांडेवाडी कचराघरामुळे प्रदूषण होत असल्याबाबत

(२१) * ३३१२५ श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील भांडेवाडी कचराघराला वेळोवेळी लागणाऱ्या आगीमुळे पसरणारा धूर व सडलेल्या कचऱ्यातील गाळ जमिनीत झिरपत असल्याने प्रदुषित झालेल्या परिसरातील वस्त्यांमध्ये श्वसन आणि इतर विकाराने गेल्या तीन वर्षात सहा जणांचा मृत्यू झाला असल्याचे सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही, हे खरे नाही.

उक्त कारणाने एखाद्याचा मृत्यू झाल्याची नोंद महानगरपालिका अभिलेखात आढळत नाही.
(२) व (३) नागपूर शहरातून प्राप्त होणा-या १२०० मेट्रीक टन घनकच-यापैकी १५० ते २०० मे.ट. घनकच-यावर सद्य:स्थितीत प्रक्रिया करण्यात येत असून, उर्वरितपैकी ८०० मे.ट. घनकच-यावर प्रक्रिया करुन त्यापासून वीजनिर्मिती करण्याची कार्यवाही महापालिकास्तरावर प्रस्तावित आहे.

तसेच भांडेवाडी येथील कचराघराला लागणा-या विशेषत: उन्हाळ्यात लागणा-या आगी तात्काळ आटोक्यात आणण्यासाठी, प्रकल्पस्थळावर २ हायड्रंडची निर्मिती करण्यात आलेली असून, त्यासाठी लागणारे मुबलक पाणी त्याच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

ठाणे येथील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

(२२) * ३१०१३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक २३६३३ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणानुसार अधिकृत धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींची संख्या ३,३३५ आणि अनधिकृत धोकादायक व अतिधोकादायक इमारतींची संख्या २,७७१ असल्याची माहिती माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकृत व अनधिकृत इमारती अशी वर्गवारी न करता या सर्व इमारतींचे क्लस्टर करुन त्यांचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) ठाणे महानगरपालिका हद्दीत सन २०१७ मध्ये पावसाळ्यापूर्वी केलेल्या सर्वेक्षणानुसार एकूण ३,६९३ धोकादायक इमारती आढळून आलेल्या असून सदर इमारतींपैकी २,७८४ इमारती अनधिकृत आहेत.

(२) ठाणे महानगरपालिकेने मोडकळीस आलेल्या इमारतीतील रहिवाशांच्या सुरक्षिततेबाबत शासन निर्णय दिनांक ०५/११/२०१५ अन्वये कारवाई करण्यात येते.

- अतिधोकादायक व राहण्यास अयोग्य ६८ इमारतींपैकी ५५ इमारती रिक्त करण्यात आल्या आहेत.
- रिक्त करण्यात आलेल्या ५५ इमारतींपैकी १३ इमारती तोडण्यात आल्या आहेत.
- उर्वरित १३ इमारतींपैकी ६ इमारती रिक्त करण्यास न्यायालयाची स्थगिती आहे. उर्वरित ७ इमारती रिक्त करण्याची कार्यवाही ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

- ठाणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये इमारतींच्या पुनर्बांधणी संदर्भात शासनाने दिनांक ०५/०७/२०१७ च्या अधिसूचनेनुसार नागरी पुननिर्माण योजनेची नियमावली समाविष्ट केली आहे. यामध्ये नियमातील तरतुदींच्या अनुषंगाने अधिकृत व अनधिकृत इमारतींचा समावेश करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कचराभूमीची क्षमता संपल्याने मा.मुंबई उच्च न्यायालयाने नव्या बांधकामावर बंदी घातल्याबाबत

(२३) * ३३८०० श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड व देवनार येथील कचराभूमीची क्षमता संपल्याने मा.मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईतील नव्या बांधकामावर बंदी घातल्यामुळे उपनगरांमध्ये गरीब व झोपडपट्टीत राहणा-यांना दोन लाखात घर उपलब्ध करुन देणा-या शासनाच्या उद्दिष्टाला खिळ बसली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाने नव्या इमारतींच्या बांधकामावर बंदी आणल्यामुळे ५०० ते ६०० इमारतींचा पुनर्विकास प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक इमारतीतील काही रहिवाशांनी विकासकांशी करार करुन घरे रिकामी करुन विकासकाला दिली असून नव्या बांधकामाला परवानगी मिळत नसल्याने या इमारतींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याने काही इमारतींमधील रहिवाश्यांना विकासकांनी पर्यायी घराचे भाडे देणे बंद केले असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर बांधकामावरील बंदी उठवावी यासाठी मा.उच्च न्यायालयात शासनाची बाजू मांडण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) याबाबतचे वृत्त दिनांक ०४ मे, २०१७ व ०६ मे, २०१७ रोजीच्या वृत्तपत्रांत प्रसिध्द झाले आहे.

मुलुंड व देवनार येथील कचराभूमीसंदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत मा.उच्च न्यायालयाने दिनांक २८/०२/२०१६ रोजी, महानगरपालिकेने किंवा राज्य शासनाने दिनांक १ मार्च, २०१६ पासून व तद्नंतर सादर होणाऱ्या निवासी किंवा व्यावसायिक इमारतीच्या बांधकामांच्या प्रस्तावांना (मॉल्स, हॉटेल्स व रेस्टॉरंट्स सहित) आय.ओ.डी./सी.सी. देण्यास मनाई केली आहे.

तथापि, सदर आदेश खालील प्रस्तावांना लागू नाहीत:-

- डी.सी.आर. ३३(५) ते ३३(१०) खालील प्रस्ताव
- हॉस्पिटल व शाळा यांच्या इमारतींचे प्रस्ताव
- सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत सोसायटीच्या अस्तित्वात असलेल्या इमारतीच्या बांधकामाक्षेत्रफळाएवढयाच पुनर्विकासाच्या बांधकामाचे प्रस्ताव

सदर आदेशामुळे झोपडपट्टी पुनर्विकासाबाबतचे प्रस्ताव बाधीत होत नाहीत.

तथापि, पुनर्विकास होणाऱ्या इमारतीमधील रहिवाशांना पर्यायी घरभाडे देण्याची बाब संबंधित विकासक व भाडेकरु यांच्याशी संबंधित आहे.

(४) व (५) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशातील खालील मुद्यांची पुर्तता करण्यात आलेली आहे:-

- कचऱ्याचे विलगीकरण करण्यासाठी ३५ केंद्र सुरु करण्यात आली आहेत. पुढील कालावधीत केंद्रांची संख्या वाढविणे प्रस्तावित असून, पालिकेच्या सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे.
- देवनार क्षेपणभूमीच्या परिरक्षणाबाबत उपाययोजना सुचविणे व त्यानुषंगाने याबाबत पर्यवेक्षणाकरिता आय.आय.टी. मुंबई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.
- क्षेपणभूमीच्या देखभाल व दुरुस्तीवरील देखरेख व आढाव्याकरीता समिती स्थापन करण्यात आलेली आहे.
- आय.आय.टी. मुंबई व देखरेख समिती यांनी सुचविलेल्या उपाययोजनांप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता देवनार क्षेपणभूमीसाठी उप आयुक्त (घन कचरा व्यवस्थापन) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
- क्षेपणभूमीचे संरक्षणसाठी पोलीस उप आयुक्त यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

- क्षेपणभूमीभोवती २.९ कि.मी. लांबीची संरक्षक भिंत उभारण्यात आली आहे.
- क्षेपणभूमी येथे पुरेसे सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.
- क्षेपणभूमीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली आहेत.
- नागरी घन कचऱ्यापासून तसेच नवीन इमारती व नवीन प्रकल्पाच्या विकासातून निर्माण होणारे दगडमाती पासून निर्माण होणारा परिणामाचे शास्त्रोक्त मुल्यांकन करण्याकरिता ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट यांना नियुक्ती करण्यात आले आहे.
- कचऱ्यापासून विजनिर्मिती साठी सल्लागार म्हणून मे. टाटा कन्स्लटन्सी इंजिनियर्स यांची नेमणूक करण्यात आली आहे.
- आयआयटी व निरीने देवनार क्षेपणभूमीसाठी सुचविलेल्या उपाययोजना अंमलात आणण्यात येत आहे.

केलेल्या कार्यवाहीचा तपशील मा.उच्च न्यायालयास सादर करण्यात आला आहे.

नाशिक जिल्हयातील महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत गोठयांवर कारवाई करण्याबाबत

(२४) * ३१३६४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील महानगरपालिका क्षेत्रात आरोग्यास बाधक ठरणा-या अनधिकृत गोठयांवर नगररचना विभागामार्फत कारवाई करण्यात येणार असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्यास बाधक ठरणा-या गोठयांची व्यवस्थित निगा राखण्याबाबत तसेच माहे जुलै, २०१७ अखेरीस अनधिकृतपणे असलेल्या गोठयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) आरोग्यास बाधक ठरणाऱ्या, तसेच अनधिकृत गोठेधारकांना मे, २०१७ व जून, २०१७ मध्ये नोटीसा देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे.

(२) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील जे गोठेधारक त्यांच्या गोठ्यातील मलमूत्राची विल्हेवाट शास्त्रीय पध्दतीने व नियमानुसार करत नाहीत, अशा २१ गोठेधारकांना महानगरपालिकेमार्फत मे, २०१७ मध्ये नोटीसा देण्यात आल्या आहेत.

तसेच, गोठ्यांचे अनधिकृत बांधकाम केलेल्या ५५ गोठेधारकांना नाशिक महानगरपालिकेमार्फत नोटीसा देण्यात आल्या असून, उर्वरित गोठेधारकांना नोटीसा देण्याची कार्यवाही सुरु आहे.

मालेगाव महानगरपालिकेने देखील अनधिकृत असलेल्या गोठ्यांबाबत संबंधितांना नोटीसा दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांकरिता केलेल्या यंत्र खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

(२५) * ३१७८५ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २६८४३ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी (आय.टी.आय.) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत सन २०१३-१४ मध्ये दरकरार पत्रावर करण्यात आलेल्या यंत्र सामुग्रीच्या खरेदीमध्ये अनियमितता झाल्याची बाब तत्कालिन संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने प्रस्तुत प्रकरणी प्रथम प्राथमिक चौकशी करून दोषी असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नावांसह परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांना शासनामार्फत देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी प्रथम प्राथमिक चौकशीचे कामकाज पूर्ण होऊन परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी संबंधितांविरुध्द कोणती कायदेशीर कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणाची प्राथमिक चौकशी करुन त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल प्रस्तुत प्रकरणात दोषी असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या नावासह तसेच परिपूर्ण कागदपत्रांसह शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांना शासनामार्फत देण्यात आल्या होत्या, हे खरे आहे. तथापि, आता या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्यानुसार चौकशी समिती नेमण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

फडणीस ग्रुप ऑफ कंपनीच्या संचालकांनी गुंतवणूदारांची फसवणूक केल्याबाबत

(२६) * ३३३८९ श्री.जयंत पाटील, श्री.रविंद्र फाटक, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फडणीस ग्रुप ऑफ कंपनीच्या संचालकांनी माहे सप्टेंबर, २०१३ पासून सुमारे ९०० हून अधिक गुंतवणूदारांची कोटयवधी रूपयांची फसवणूक केली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक गुंतवणूकीसंबंधीच्या वेगवेगळया योजनांमधून जादा व्याजदराचा परतावा देण्याचे आमिष दाखवून ९०० गुंतवणूकदारांची कोटयवधी रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी ठाणे येथील वृंदावन परिसरातील श्री.मुकंद माधव धायगुडे यांनी नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणात आतापर्यंत ४० हून अधिक गुंतवणूकदार पुढे आले असून त्यांच्या फसवणूकीचा आकडा ४ ते ५ कोटी रूपये इतका असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) होय.

(४) सदरहू प्रकरणी नौपाडा पोलीस स्टेशन ठाणे येथे गु.र.क्र.१४५/२०१७ भा.द.वि.कलम ४२०, ४०९, १२० (ब) सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थेच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला असून सदर गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर करीत आहे. सदर गुन्हयात दोन आरोपींना अटक केली आहे. तसेच कंपनीच्या नावे असलेली बँक खाती गोठविणेबाबत बँकाना व त्यांची मालमत्ता संरक्षित करणेबाबत संबंधित प्राधिकारी यांना कळविले आहे.

सदरचा गुन्हा तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

डोंबिवली (पूर्व) (जि.ठाणे) येथील रेल्वे स्टेशन परिसरात वाहतुक पोलिसांची संख्या वाढविण्याबाबत

(२७) * **३३२८७ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (पूर्व) (जि.ठाणे) येथील रेल्वे स्टेशन परिसरात वाहतुकीचा ताण असलेल्या मानपाडा रस्त्यावरील वाहतूक मार्गामध्ये पोलिसांनी केलेल्या अचानक बदलामुळे नागरिकांना त्रास होत असुन वाहनचालकांसह पादचारी देखील त्रस्त झाले असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रॅफिक वॉर्डन व होमगार्ड यांची वाहतूक पोलिसांना मदत होत असली तरी चांगल्या प्रकारे वाहतूक नियंत्रण होण्यासाठी वाहतूक पोलिसांची संख्या वाढविणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) डोंबिवली (पूर्व) रेल्वेस्टेशन परिसरातून साधारणत: ३ लाख प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे या भागात सकाळ संध्याकाळी मनपा परिवहन बसेस, तसेच स्कूल बसेस व ऑटोरिक्षांची सतत ये-जा असते. तेथेच मुख्य बाजारपेठ, मच्छीबाजार असून रस्ते अरुंद असल्यामुळे परिसरात

वाहतुकीची कोंडी असल्याचे चित्र दिसते. याकरीता वाहतुक शाखेचे अधिकारी, महानगरपालिका व परिवहन खात्याचे अधिकारी यांनी संयुक्तीकरित्या त्या भागाची पाहणी करुन दिनांक १८/०४/२०१७ रोजी सर्वसाधारण वेळेत प्रायोगिक तत्वावर मानपाडा रोडवर ग्रीन चौक ते इंदिरा चौक जाणाऱ्या रिक्षांना प्रवेश बंद केला. परंतु करण्यांत आलेला बदल हा गैरसोयीचा व त्रासदायक वाटल्याने त्याच दिवशी वाहतूक पुन्हा पुर्ववत सुरु करण्यात आलेली आहे.

(२) वाहतूक नियंत्रणाकरीता सध्या १ पोलीस निरीक्षक, १ सहायक पोलीस निरीक्षक, १ पोलीस उपनिरीक्षक व २६ पोलीस अंमलदार यांची वाहतूक नियंत्रणासाठी नियुक्ती करण्यांत आली असून मदतीसाठी १६ ट्रॅफिक वार्डन पुरविण्यांत आलेले आहे.

(३) डोंबिवली शहरातील वाहतूक समस्येच्या अनुषंगाने वाहतूक शाखेचे सहायक पोलीस आयुक्त (कल्याण विभाग), पोलीस निरीक्षक, डोंबिवली पोलीस ठाणे त्याचप्रमाणे कल्याण डोंबिवली महानगरपालिका व कल्याण प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी यांची सर्वेक्षण समिती गठीत करण्यांत आली होती. सर्वेक्षणातील अहवालावर जनतेच्या हरकती व सूचना मागविण्यांत आल्या होत्या. त्यानंतर डोंबिवली शहरात दिनांक १४/०६/२०१७ रोजी रिक्षा थांब्यासाठी व पार्किंगच्या अनुषंगाने अशा दोन अधिसूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या अधिसूचनांच्या अनुषंगाने वाहतूक नियंत्रण करण्याची कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तुळजापुर नगरपरिषदेतील गैरव्यवहाराबाबत

(२८) * **३३७०७ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापुर नगरपरिषदेतील तीर्थक्षेत्र यात्रा अनुदान, घरकुल योजना, ५१ कोटीच्या विकास कामातील गैरव्यवहाराचे प्रकरण ताजे असतानाच भक्तांच्या सोयीसाठी उभारलेले यात्री निवास बेकायदेशीररित्या भाडयाने देऊन लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा प्रकार माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीर्थक्षेत्र येथील धर्मशाळा मर्जीतील व्यक्तींना तसेच नातेवाईकांना देऊन लाखो रुपयांचा गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरण सहा वर्षापूर्वी निदर्शनास आले असताना विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी कारवाईचे आदेश देऊन यात्री निवासाला सील ठोकले होते तसेच आदेश देऊनही दोषींवर कारवाई झाली नाही पण यात्री निवास सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) जिल्हाधिकारी यांचेकडे या आशयाची तक्रार दिनांक २६ एप्रिल, २०१२ रोजी प्राप्त झाली होती.

त्यानुषंगाने जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार उप विभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांनी तुळजापूर नगरपरिषदेच्या अखत्यारीतील पंडीत दीनदयाळ उपाध्याय धर्मशाळेस दिनांक २५ एप्रिल, २०१२ रोजी भेट दिली.

भेटीदरम्यान सदर धर्मशाळेचा अनधिकृत वापर होत असल्याचे निदर्शनास आले.

(२), (३) व (४) सदर धर्मशाळेच्या लिलावाची सूचना दिनांक २६ एप्रिल, २०१२ रोजी प्रसिध्द करुन दिनांक ३ मे, २०१२ रोजी लिलाव करण्यात आला.

सर्वात जास्त रकमेची बोली लावणारे श्री. संपत गंगणे यांचे नावे लिलाव मंजूर करण्यात आला.

सदर लिलावानुसार प्रतिवर्षी रु.५,४४,०००/- प्रमाणे सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत रु. २७,२०,०००/- रक्कम लिलावधारकाकडून नगरपरिषदेस प्राप्त होणे अपेक्षित आहे. त्यापैकी रु.६,९०,०००/- रकमेचा भरणा लिलावधारकाने केला आहे.

उर्वरित रकमेच्या वसुलीसाठी नगरपरिषदेकडून कार्यवाही सुरु आहे.

लिलावधारकाने थकबाकीचा भरणा न केल्याने धर्मशाळेस नगरपरिषदेने दिनांक ०८ मार्च, २०१७ रोजी सील केले आहे.

सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने दिनांक १४/०७/२०१७ रोजी संबंधिताविरुध्द तुळजापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील गोसेखुर्द सिंचन प्रकल्पातील गैरव्यवहाराबाबत

(२९) * ३२६०३ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील गोसेखुर्द सिंचन प्रकल्पातील नेरला (पाघोरा) उपसा सिंचन योजना आणि घोडाझरी कालव्यातील सिंचन गैरव्यवहारात विदर्भ पाटबंधारे महामंडळातील दहा निवृत्त अधिका-यांसह तीन कंपन्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हे दाखल केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरील सिंचन गैरव्यवहार करणा-या संबंधित निवृत्त अधिकाऱ्यांसह तीन कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) घोडाझरी शाखा कालव्याच्या कामात चौकशीअंती गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाल्यामूळे आरोपी लोकसेवक तसेच आरोपी कंत्राटदार व भागीदार यांच्याविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायदा व भारतीय दंडविधान अन्वये मा. विशेष न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, तसेच नेरला(पाघोरा) उपसा जलसिंचन योजनेच्या कामात आरोपींविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायदा व भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास अद्याप सुरू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

मुंबईतील नालेसफाईच्या कामाबाबत

(३०) * ३२२२५ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नालेसफाईसाठी माहे एप्रिल, २०१७ अखेरपर्यंत कंत्राटदार न मिळाल्याने नालेसफाईच्या कामास सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आगामी पावसाळ्यात नाले तुंबू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) पावसाळयात नाले तुंबू नये म्हणून सन २०१७-१८ या वर्षाकरिता नालेसफाईसाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

- बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नालेसफाईचे काम ३ टप्प्यांत करण्यात येते.
- पहिल्या टप्प्यामध्ये गाळाच्या एकूण परिमाणाच्या ६०% काम पावसाळयापूर्वी, २०% काम पावसाळा कालावधीत व उर्वरित २०% पावसाळयानंतर करण्यात येते.
- दरवर्षी मुंबई शहर, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरे यांमधील २९ मोठया नालेसफाईचे काम महानगरपालिकेमार्फत केले जाते.
- त्यानुसार मुंबई शहर, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरे यांमधील २९ मोठया नाल्यांपैकी १८ नाल्यांमधील गाळ काढण्याच्या कामांकरिता नियुक्त केलेल्या कंत्राटदारांकडून गाळ काढण्याची पावसाळयापूर्वीची कामे दिनांक ३१/०५/२०१७ पर्यंत पूर्ण करुन घेण्यात आली आहेत.
- तसेच, १० नाल्यांमधील गाळ काढण्याचे काम अशासकीय संस्थांमार्फत करुन पावसाळयापूर्वीची कामे दिनांक १०/०६/२०१७ पर्यंत पूर्ण करुन घेण्यात आले.
- शहर विभाग व पश्चिम उपनगरातून वाहणाऱ्या मिठी नदीतील गाळ काढण्याचे काम अनुक्रमे दिनांक ३१/०५/२०१७ व दिनांक १३/०६/२०१७ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.
- मुंबई शहर, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरांमधील ५ फुटापेक्षा कमी रुंदी असलेल्या छोटया नाल्यांमधील गाळ काढण्याच्या कामांकरिता मागविण्यात आलेल्या निविदांना अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे अशासकीय संस्थांमार्फत गाळ काढण्यात येऊन गाळ उचलण्याकरिता स्वतंत्र कंत्राटदाराची नेमणुक करण्यात आली आहे.

महागाव (जि.यवतमाळ) येथे शुध्द पाणीपुरवठा करण्याबाबत

(३१) * **३४११४ श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (जि.यवतमाळ) येथील जलशुध्दीकरण केंद्र पूर्ण करण्यास दहा वर्षांचा कालावधी लागला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुपये दोन कोटी दहा लक्ष खर्च करुनही महागाव येथील नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जीवन प्राधिकरण विभागाच्या तसेच महागाव नगरपंचायतीच्या कारभारामुळे नागरिकांना शुध्द पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून नागरिकांना शुध्द पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३)

- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत महागाव वाढीव पाणी पुरवठा योजनेचे कार्यादेश दि. २५/०१/२०१० रोजी देण्यात आली होते. तथापि तत्कालिन ग्राम पंचायतीने जलशुध्दीकरण केंद्राला जागा उपलब्ध न केल्याने योजना पुर्णत्वास कालावधी लागला आहे, हे खरे आहे.
- महागाव ग्रामपंचायतीचे दि.०८/०४/२०१५ रोजी नगरपंचायतमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. त्यानंतर दि.२९/०९/२०१५ पासुन जलशुध्दीकरण केंद्रामार्फत पाणीपुरवठा चाचणी दाखल सुरू करण्यात आला आहे.
- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडुन सदरच्या जलशुध्दीकरण केंद्राचे अद्याप नगरपंचायतीकडे हस्तांतरण झालेले नाही.
- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत रासायनिक व अणुजीवशास्त्रीय तपासणी दि.२०/०५/२०१७ रोजी करण्यात आली असुन मुख्य अणुजीवशास्त्रज्ञ, जिल्हा आरोग्य प्रयोग शाळा यांच्या अहवालानुसार चाचणीचे निष्कर्ष “पाणी पिण्यास योग्य” असे आहेत.
- या योजनेवर सुमारे रूपये १.७८ कोटी इतका खर्च झाला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कै.कर्मवीर दादासाहेब गायकवाड क्रीडांगणाचा नियमबाह्य विकास केला जात असल्याबाबत

(३२) * ३१२५१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर :

सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने कल्याण (पूर्व) भागातील कै.कर्मवीर दादासाहेब गायकवाड मैदानाचे सुशोभीकरण व विकासाचे काम माहे जुलै, २०१५ पासून सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या डी.सी. रूल प्रमाणे खेळाचे मैदान वा मनोरंजनाचे मैदान विकसित करताना मुळ मैदानाच्या १५ टक्केच्या १० टक्केच बांधकाम करण्याची तरतुद करण्यात आली आहे, तसेच सदरहू मैदानात सुमारे ३५ टक्के जागेत डी.सी.रूलचे उल्लंघन करुन बांधकाम करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे महानगरपालिका अधिका-यांकडून सदरहू प्रस्तावाची फाईल मंजूर करताना महानगरपालिकेच्या डी.सी. रुलचे जाणीवपूर्वक उल्लंघन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार नियमांचा भंग करून बांधकाम परवानगी देणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) राज्य शासनाने सर्व महानगरपालिकांकरीता समावेशक आरक्षणाचे माध्यमातून विकास योजना आरक्षणांची अंमलबजावणी करण्याचा विनियम दिनांक २/५/२०१६ च्या अधिसुचनेद्वारे मंजूर केला आहे. यानुसार क्रिडांगण, बगीचा इत्यादी सारख्या आरक्षणामध्ये १५ टक्के बांधकाम अशा प्रकारच्या सलंग्न वापरासाठी (Allied User) अनुज्ञेय आहेत. महानगरपालिका आयुक्त यांचे अहवालात नमूद केल्यानुसार सदर बांधकाम अनुज्ञेय बांधकाम क्षेत्राचे मर्यादेत आहे.

(३) अशी बाब दिसून येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीक्षेत्र पंढरपूर शहराच्या मुख्य चौकात सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविणेबाबत

(३३) * ३३७५१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर शहरातून मोठ्या प्रमाणात मोटारसायकली चोरीला गेल्याच्या घटनांची नोंद पंढरपूर शहर पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही मोटारसायकली आजतागायत सापडल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंढरपूर शहरात प्रत्येक एकादशीला मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येत असतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पंढरपूर शहरातील मुख्य चौकांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) पंढरपूर शहरात सन २०१६ व सन २०१७ मध्ये चोरीस गेलेल्या मोटारसायकलीबाबत दाखल गुन्ह्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

सन	दाखल गुन्हे	उघड गुन्हे	अटक आरोपींची संख्या	चोरीस गेलेल्या मोटार सायकलची संख्या	मिळालेल्या मोटार सायकली ची संख्या	मिळून न आलेल्या मोटार सायकली ची संख्या
२०१६	४७	१६	२१	४७	१७	३०
जून २०१७ अखेर	१७	०४	०४	१७	०४	१३

(३) पंढरपूर शहरात प्रत्येक एकादशीला मोठ्या प्रमाणावर भाविक दर्शनासाठी येत असतात.

(४) पंढरपूर शहरातील मुख्य चौकामध्ये सीसीटीव्ही बसवण्याबाबतचा प्रस्ताव गृह विभागास अद्याप प्राप्त झालेला नाही.

(५) विलंब झालेला नाही.

मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतींचा पुनर्विकास करणेबाबत

(३४) * ३१४५४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक २७९३१ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत म्हाडाच्या ५६ वसाहती असून या वसाहतीतील काही इमारती मोडकळीस आलेल्या असून त्यापैंकी सुमारे नऊ इमारती अतिधोकायदायक अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ५६ वसाहतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून विचाराधीन असून त्यावर निर्णय घेण्यास असमर्थनीय असा विलंब होत आहे, ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचप्रमाणे उक्त ५६ वसाहतींपैकी काही वसाहतींच्या पुनर्विकासासाठी विकासक नेमण्याची प्रक्रिया गत चार-पाच वर्षांपासून सुरु असून काही वसाहतींसाठी विकासकाची निवड झालेली असतानाही प्रत्यक्षात पुनर्विकासाची कार्यवाही सुरु करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या एकंदर प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारितील म्हाडाच्या ५६ वसाहतींमधील काही इमारती जुन्या व जीर्ण झालेल्या आहेत. तथापि मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील मुंबई शहर बेटावरील अ, ब व क वर्गातील एकूण १९६४२ उपकर प्राप्त इमारतींपैकी ९ इमारती सन २०१७ च्या पावसाळ्यापूर्वीच्या सर्वेक्षणात धोकादायक घोषित करण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

म्हाडा वसाहतींमधील इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(५) मध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. पुनर्विकासास गती येण्यासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(५) मध्ये नव्याने शासनाच्या दि.०३/०७/२०१७ रोजीच्या अधिसूचनेअन्वये काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

(३) म्हाडा वसाहतींमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकासक नेमण्याचे अधिकार आहेत व त्यानुसार विविध सहकारी गृहनिर्माण संस्थांचा पुनर्विकास सुरु आहे
(४) पुनर्विकासास गती येण्यासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(५) मध्ये दि.०३/०७/२०१७ रोजीच्या अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील गोवंडी येथील महानगरपालिकेच्या शताब्दी रूग्णालयात सोई-सुविधा पुरविणेबाबत

(३५) * **३२५२४ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गोवंडी येथील महापालिकेच्या शताब्दी रूग्णालयात अपुरे कर्मचारी व सोई-सुविधांच्या अभावामुळे मोठया प्रमाणात रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शताब्दी रुग्णालय सुपरस्पेशालिटी बनविण्याची घोषणा शासनाद्वारे करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयात आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन सदरील रुग्णालय सुपरस्पेशालिटी बनविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

सदर रुग्णालयातील वैद्यकीय/वैद्यकेतर कर्मचाऱ्यांची बहुतांश पदे भरलेली आहेत. तसेच रुग्णालयास आवश्यक असलेली यंत्रसामुग्री उपलब्ध असून काही नवीन यंत्रसामुग्री महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आलेली आहे.
(२) शताब्दी रुग्णालय सुपरस्पेशालिटी बनविण्याची घोषणा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे हे खरे आहे.
(३) व (४) शताब्दी रुग्णालयातील उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

सुपरस्पेशालिटी रुग्णालय करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

- सध्या अस्तित्वात असलेल्या पंडित मदनमोहन मालवीय शताब्दी रुग्णालयाच्या शेजारी असलेल्या मोकळया जागेत ८४० रुग्णशय्यांची इमारत बांधण्यासाठी निविदेची कार्यवाही पूर्ण झाली आहे.
- सदर इमारतीत सुपरस्पेशालिटी रुग्णालयासाठी आवश्यक यंत्रसामुग्री व विभाग सुरु करण्यात येणार आहे.

राज्यातील पोलीस ठाण्यात आठ तास ड्युटीचा प्रयोग राबविण्याबाबत

(३६) * ३१२३१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली ७० पोलीस ठाण्यांमध्ये आठ तास ड्युटीचा प्रयोग यशस्वी झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपलब्ध मनुष्यबळाच्या जोरावर कामकाजाचे अचूक नियोजन केल्यास आठ तासांची ड्युटी कोणत्याही अडचणीविना सहज शक्य असल्याचे यावरुन स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी सदर यशस्वी प्रयोग राज्यातील पोलीस ठाण्यात राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई आयुक्तालयांतर्गत टप्प्या टप्प्याने आतापर्यंत ५५ पोलीस ठाण्यामध्ये आठ तास कर्तव्याचा प्रयोग यशस्वीपणे सुरु करण्यात आलेला आहे.

(२) होय,

(३) व (४) बृहन्मुंबई पोलीस दलातील पोलीस ठाण्यातील उपलब्ध मुनष्यबळ हे तुलनेने ग्रामीण भागातील पोलीस ठाण्यातील उपलब्ध मुनष्यबळापेक्षा संख्येने जास्त असते. मुंबई शहरातील पोलीस ठाण्याची भौगोलिक हद्द ही छोटी असून दळणवळणाची साधने मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. तर ग्रामीण भागातील पोलीस ठाण्यात गावांची संख्या मोठी असून भौगोलीक हद्द विखुरलेली असते. त्यामुळे मुंबई शहराच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील इतर ठिकाणी हा प्रयोग राबविण्यात आलेला नाही.

ठाणे महानगरपालिका हद्दीतील गृह प्रकल्पाकरिता वृक्षतोडीची परवानगी दिलेल्या विकासकांनी हमीपत्रानुसार वृक्ष लागवड न केल्याबाबत

(३७) * ३३२५४ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील गृह प्रकल्पाकरिता वृक्षतोडीची परवानगी दिलेल्या २५ विकासकांनी हमीपत्रानुसार वृक्ष लागवड न केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हमीपत्रानुसार ठाणे शहरातील वृक्ष लागवड न करणाऱ्या मान डेव्हलपर्स, कॉसमोस, रेप्ताकोस यांच्यासह २५ विकासकांना माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विकासकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) वृक्ष प्राधिकरण, ठाणे महानगरपालिका यांनी केलेल्या सर्वेक्षणात वृक्षतोडीची परवानगी देण्यात आलेल्या ११२ विकासकांपैकी ५० विकासकांनी वृक्षांचे नव्याने रोपण केले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय. एकूण ५० विकासकांना महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ अन्वये नोटिस बजावण्यात आल्या आहेत.

(३) याप्रकरणी प्रथम दर्शनी विकासकांनी आवश्यक झाडांचे नव्याने रोपण न केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचेविरुध्द महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ अन्वये कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आले आहेत.

तसेच तीन महिन्याच्या कालावधीत विहीत झाडांचे रोपण पुर्ण करण्याचे निर्देश संबंधित विकासकांना देणेबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना सुचित करण्यात आले आहे.

तसेच या प्रकरणी जबाबदार सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांचेवर जबाबदारी निश्चित करण्याच्या सुचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुण्यातील शिवाजीनगर बसस्थानकाजवळील अतिक्रमणे हटविण्याबाबत

(३८) * **३२००१ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील शिवाजीनगर येथील बसस्थानकाची अतिक्रमणांनी कोंडी झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानकाची शासनामार्फत पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार येथील अतिक्रमणे हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पुण्यातील शिवाजीनगर येथील बसस्थानकाच्या लगतच्या रस्त्यावरील अतिक्रमणांमुळे तेथील रहदारीस अडथळे निर्माण होत असल्याचे तसेच नागरीकांना गैरसोय होत असल्याचे एप्रिल, २०१७ च्या दरम्यान पुणे महानगरपालिकेच्या दैनंदिन तपासणीच्यावेळी निदर्शनास आले होते, हे खरे आहे.

(२)

- पुणे महानगरपालिकेने केलेल्या तपासणीत शिवाजीनगर येथील बस स्थानकाच्या कंम्पाऊंड लगतच्या रस्ता तसेच पदपथावर खाद्यपदार्थ विक्रेते व इतर अनाधिकृत पथारीवाल्यांनी अतिक्रमण केल्याचे दिसून आले आहे.
- सदरची अतिक्रमणे निदर्शनास आल्यानंतर शिवाजीनगर बसस्थानकाच्या परिसरातील रस्ता, पदपथांवरील अतिक्रमण निर्मुलनाबाबत दि.२१/४/२०१७, दि.२३/५/२०१७ व दि.३१/०५/२०१७ रोजी कारवाई करण्यात आलेल्या आहेत.
- सदर कारवाईमध्ये तेथील खाद्यपदार्थ विक्रेते व इतर फेरीवाल्यांची व्यवसाय साधने जप्त करून सदरचा परिसर अतिक्रमण मुक्त करण्यात आला आहे.
- तसेच दि.३/६/२०१७ व दि.४/७/२०१७ रोजी सदर परिसरातील एसटी स्टँड कंम्पाऊंड शेजारील अनाधिकृत पथारी व्यवसायीक व रस्त्यालगतच्या खाजगी इमारतीच्या साईड मार्जीनमधील पक्क्या शेड व व्यावसायिकांवर कारवाई करून सदरच्या शेड काढून टाकण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागभीड व चिमूर नगरपरिषद क्षेत्रात अग्निशमन केंद्र व वाहन उपलब्ध करण्याबाबत

(३९) * **३३७५५ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावली (जि.चंद्रपूर) येथे दिनांक २३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या शेतकऱ्यांच्या घरांना आग लागल्याने वित्तहानी झाली तसेच पाळीव जनावरांचा होरपळून मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेत आग विझविण्यासाठी सावली परिसरात अग्निशमन केंद्राचे वाहन उपलब्ध नसल्यामुळे आगीचा व्याप वाढल्याने दुर्घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासोबतच सावली परिसरामध्ये अग्निशमन केंद्राचे वाहन उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, मुख्य राष्ट्रीय महामार्गांच्या जोड असलेल्या नागभीड व चिमूर मुख्यालयी नगरपरिषद क्षेत्रात अग्निशमन केंद्र व आपत्कालीन वाहन उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) सावली नगरपंचायत येथे अग्निशमन केंद्राचे वाहन उपलब्ध नसल्याने गडचिरोली नगरपरिषदेकडून अग्निशमन वाहन उपलब्ध करुन आग आटोक्यात आणण्यात आली.

(३) संबंधितांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. अग्निशमन वाहन खरेदीबाबत सावली नगर पंचायतीने ठराव केला असून, वाहन खरेदीची प्रक्रिया सुरु असल्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी अहवालात नमूद केले आहे.

(४) राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदांमध्ये अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान दिनांक ३१/०८/२००९ पासून राबविण्यात येत आहे. सदर अभियान नव्याने निर्माण झालेल्या / होणाऱ्या "ड" वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच नगरपंचायती मध्ये राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक १२/०८/२०१६ रोजी घेतला आहे. त्यानुषंगाने नागभीड व चिमूर नगरपरिषदंकडून सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेत गैरव्यवहार करणा-या नगररचनाकारास मुदतवाढ देण्यात आल्याबाबत

(४०) * ३०९७३ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक २९४७१ ला दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेत नगररचनाकार पदावर कार्यरत असताना श्री.दिलीप घेवारे यांनी केलेल्या आर्थिक व जमीन गैरव्यवहाराची प्रकरणे निदर्शनास आली असताना त्यांची मिरा-भाईंदर महानगरपालिकेत नगररचनाकार या पदावर नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी बनावट दाखले देऊन शासकीय जमिनी खासगी विकासकांना देऊन करोडो रुपयांच्या गैरव्यवहार केल्याप्रकरणी ठाणे पोलिसात गुन्हा दाखल झालेला असतांनाही त्यांची चौकशी न करता त्यांना पुन्हा मिरा-भाईंदर महानगरपालिकेत मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगररचनाकार, श्री.दिलीप घेवारे यांनी दुर्बल घटकांच्या घरांसाठी राखीव असलेली शासनाची ८० लाख चौरस फुट जमीन ४४ हून अधिक बनावट दाखले तयार करुन विकासकामांचे बांधकाम आराखडे मंजूर करुन सदर जमिनी विकासकांना दिल्याचे आरोप लोकप्रतिनिधींनी वारंवार करुनही अशा भ्रष्ट नगररचनाकाराला राज्याच्या मंत्रालयातूनच संबंधित विभागाचे अभय असल्याचा आरोप लोकप्रतिनिधींनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नगररचनाकार यांची अद्याप चौकशी व त्यानुषंगाने कारवाई न करण्याची व त्यांची मुदत संपलेली असतांनाही त्यांना मुदतवाढ देण्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नवी मुंबई महानगरपालिकेत नगररचनाकार पदावर कार्यरत असताना श्री.दिलीप घेवारे यांनी केलेल्या आर्थिक व जमीन गैरव्यवहाराची प्रकरणे शासनाच्या निदर्शनास आलेली नाहीत.

तथापि, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे भाईंदर येथील जूना सर्व्हे क्र.६६३ मधील क्षेत्रासाठी नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या तरतूदी लागू नसल्याबाबतचे प्रमाणपत्र तयार करुन त्याआधारे अकृषक परवानगी व बांधकाम परवानगी प्राप्त करुन अधिनियमानुसार शासनास देय असलेले बांधिव क्षेत्र (सदनिका) न देता शासनाची फसवणूक केल्याबाबतच्या तक्रारीवरुन ठाणे नगर पोलीस स्टेशन, ता.जि.ठाणे

येथे पहिली खबर (F.I.R.) क्र.आय/२०१/१६, दि.१०/११/२०१६ रोजी दाखल केला आहे. सदर प्रकरणी सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) गुन्हे शाखा ठाणे पोलीस आयुक्त कार्यालय यांच्यामार्फत चौकशी सुरु असून प्रकरण अन्वेषणाधीन आहे. परिणामी चौकशी न करता मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात आला अशी वस्तुस्थिती नाही.

(२) होय, यासंदर्भात सन २०१६ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनात तसेच सन २०१७ च्या पहिल्या (अर्थसंकल्पिय) अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित झाली होती. तथापि, अशा आशयाची लोकप्रतिनिधींची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कापुरबावडी (ठाणे) पोलीस स्थानकातील विनयभंगाच्या तक्रारीची सहपोलीस आयुक्त यांनी प्रसारमाध्यमांना चुकीची माहिती दिल्याबाबत

(४१) * ३१५३६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कापुरबावडी पोलीस स्थानकात श्री.शैलेश येंडे याने महिलेचे आंघोळ करताना केलेल्या चित्रीकरणाविरुध्द तक्रार करायला गेलेल्या महिलेबाबत पोलीस ठाण्यातील पोलिसांनी महिलेच्या संदर्भात कोणतेही गैरवर्तन केले नाही असे चौकशी अहवालात निदर्शनास आल्याचे चौकशी करणारे सहपोलीस आयुक्त, श्री.मधुकर पांडये यांनी प्रसार माध्यमांना दिनांक १ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास सांगितले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रसार माध्यमांना दिलेल्या चुकीची माहितीची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले आहे, तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण मुंबई, यांचेमार्फत चौकशी सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पाथरी (जि.परभणी) येथील श्री.साईबाबांच्या जन्मभूमी विकास आराखडयास मान्यता देण्याबाबत

(४२) * ३३८२८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २७७८४ ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील श्री.साईबाबांच्या जन्मभूमी विकास आराखडयास मान्यता देण्यात यावी अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०१६-१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी यांनी श्री.साईबाबा यांच्या जन्मभूमीचा विकास आराखडा सादर करण्याबाबत मुख्याधिकारी, पाथरी नगरपरिषद यांना सूचित केल्यानुसार उक्त विकास आराखडा बनविण्याचे अंतिम टप्यात असलेले काम पूर्ण झाले आहे काय,

(३) असल्यास, सदरील आराखडयास मंजुरी देवून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) पाथरी नगरपरिषदेने तयार केलेला श्री.साईबाबा जन्मभुमी विकास आराखडा जिल्हाधिकारी, परभणी यांनी शासनास सादर केला आहे.

सदर आराखडयाबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून शासन पत्र दिनांक १ एप्रिल, २०१७ अन्वये स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(३) नाही.

(४) पाथरी, नगरपरिषदेने सादर केलेल्या सदर आराखड्यातील त्रुटींची पुर्तता करुन फेरसादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी नगरपरिषदेस दिलेले आहेत.

नगरपरिषद स्तरावर सदर त्रुटींची पूर्तता करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

खडकी (जि.पुणे) येथे गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याबाबत

(४३) * **३२३५४ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकी (जि.पुणे) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये खून, खंडणी, मटका, जुगार, दारुविक्री अशाप्रकारच्या बेकायदेशीर घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार गुन्हेगारी घटनांच्या वाढीस जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) खडकी (जि. पुणे) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मे, २०१६ अखेर खुनाचे २ घटना, खंडणीच्या ० घटना, मटका/जुगाराच्या १२ घटना, दारू विक्रीच्या ११ घटना घडलेल्या आहेत तर मे, २०१७ अखेर खुनाच्या २ घटना, खंडणीची १ घटना, मटका/जुगाराच्या ७ घटना, दारू विक्रीच्या ३७ घटना घडलेल्या आहेत.

उपरोक्त मे-२०१६ व मे, २०१७ या दोन वर्षाची आकडेवारी लक्षात घेता मे-२०१७ अखेर खुनाचे घटनामध्ये वाढ झालेली नाही, खंडणीचे घटनामध्ये १ ने वाढ झाली आहे, मटका/जुगाराचे घटनामध्ये ५ ने घट झालेली आहे, तर दारूविक्रीच्या घटनेत २६ ने वाढ झालेली आहे.

उपरोक्त मे-२०१६ व मे-२०१७ अखेर खून, खंडणी, मटका/जुगार, दारू विक्रीची आकडेवारी लक्षात घेता त्याबाबतच्या घटनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली नाही तसेच नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

सन २०१६ मध्ये खडकी पोलीस स्टेशन हद्दीतील एकूण ६ व सन २०१७ मध्ये एकूण ७ इसमांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आलेली आहे तसेच सन २०१६ मध्ये २ इसमांवर व सन २०१७ मध्ये १ इसमावर महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले व औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक यांचे विघातक कृत्यास आळा घालणेबाबतचा अधिनियम १९८१, सुधारणा १९९६, सुधारणा २००९ चे कलम ३ प्रमाणे १ वर्षाकरीता स्थानबद्ध करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

सन २०१६ मध्ये एका संघटीत टोळीवर व सन २०१७ मध्ये तीन संघटीत टोळ्यांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

माटुंगा (मुंबई) येथील "राजर्षी शाहू विद्यालय" शाळेचे नुतनीकरण पुर्ण करण्याबाबत

(४४) * ३०९६१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वशिक्षण अभियानांतर्गत मुलांना मोफत शिक्षण देण्यात येत असताना माटुंगा (मुंबई) येथील लेबर कॅम्पमधील "राजर्षी शाहू विद्यालय" ही शाळा नुतनीकरणाच्या नावाखाली चार वर्षापूर्वी निष्कासित करण्यात आली, मात्र महानगरपालिका व शिक्षण विभागाने ही शाळा बांधली नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत तेथील मुलांसाठी सहा छोटया खोल्यांची शाळा असून त्या विभागातील सर्वच मुलांना तेथे शिक्षण घेणे शक्य नसल्याने त्यांना अन्य ठिकाणी शाळेत जावे लागत असून सदर शाळेच्या जागी अतिक्रमण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) राजर्षी शाहू विद्यालय महापालिका शाळेची इमारत धोकादायक स्थितीत असल्यामुळे पुनर्बांधणीकरीता मार्च, २०१४ मध्ये महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आली होती.

(२) धारावी येथील राजर्षी शाहू विद्यालयाच्या इमारतीमध्ये भरत असलेल्या विविध माध्यमांच्या शाळेचे स्थलांतर माटुंगा लेबर कॅम्पमधील इमारत क्र. १, २ व ३ येथे करण्यात आलेले आहे.

राजर्षी शाहू विद्यालयाच्या निष्कासित इमारतीच्या मोकळया जागेत कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण झालेले नाही.

(३) धारावी येथे तात्पुरत्या स्वरुपात शाळेची इमारत बांधण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने ना-हरकत दर्शविली असून शाळेचे वास्तुशिल्प व नकाशे तयार करण्यात आले असून याबाबतची पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बोईसर (जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहतीतील ऑरो लॅबोरेटरीज या बंद कारखान्यात कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत

(४५) * ३१२९० श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहतीतील ऑरो लॅबोरेटरीज या बंद कारखान्यात कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रदुषण नियंत्रण मंडळाने या कारखान्याला उत्पादन बंदीचे आदेश असतांनाही चोरट्या टँकरद्वारे पाणी व जनरेटर वापरुन या कारखान्यातून उत्पादन काढणे सुरु होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने प्रदुषण नियंत्रण मंडळाची बंदची नोटीस असतांनाही बेकायदेशीरपणे कारखाना चालविणाऱ्या कारखानदारावर व कामगाराच्या मृत्यू प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) हे अंशतः खरे आहे.

सदरहू कामगाराचा मृत्यू हा कारखान्याचे बाहेर हृदय विकाराच्या झटक्याने झाला असल्याचे डॉक्टरांनी मृत्यू प्रमाणपत्रामध्ये नमूद केले आहे.
(२) व (३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांच्या दि.२८/०७/२०१६ च्या पत्रान्वये कारखान्याला बंदचे आदेश पारित केले होते. तसेच त्यानंतर दि.१७/०५/२०१७ च्या आदेशान्वये काही अटींच्या अधीनतेने कारखाना सुरु करण्याचे आदेश मंडळाने पारित केले. कामगाराचा मृत्यू हृदय विकाराच्या झटक्याने झालेला असल्याचे डॉक्टरांनी मृत्यू प्रमाणपत्रामध्ये नमूद केले आहे. ही घटना कारखान्याबाहेर झाली असल्याने कारखाने अधिनियम, १९४८ चा भंग झाला नसल्यामुळे व्यवस्थापकावर / कारखानदारावर या घटनेसाठी कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (जि.ठाणे) शहराच्या मध्यवर्ती भागांमधून जाणा-या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

(४६) * **३३३११ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहराच्या मध्यवर्ती भागामधून थेट शहराबाहेर जाण्या-येण्यासाठी रुपये ५० कोटींचा निधी मंजूर करून अंबरनाथ-चिंचपाडा-नालिंबी या रस्त्याचे बांधकाम एम.एम.आर.डी.ए. मार्फत करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मार्गाची सद्य:स्थितीत अत्यंत दुरवस्था झाली असल्याने रस्त्यावर मोठे खड्डे पडून मोठ्या प्रमाणात जिवित व वित्त हानी झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त रस्त्याची दुरूस्ती, देखभाल व डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे शहरातील बोगस कॉल सेंटरवर कारवाई करणेबाबत

(४७) * **३१६०१ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात मोठ्या प्रमाणात बोगस कॉल सेंटर सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार बोगस कॉल सेंटर चालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय.

सदर प्रकरणी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१५५/२०१७, ४१९, ४२०, १२० (ब), ४६५, ४६७, ४६८, ४७१ सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ चे कलम ६६ (ब), ६६ (क), ७२ (१), ७५ सह द इंडियन टेलीग्राफ ॲक्ट कलम २५ (अ) प्रमाणे दिनांक ०९/०६/२०१७ रोजी १० आरोपींचे विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर गुन्हयात ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. याबाबत तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरासभोवतालच्या २६ गावांचा झालर क्षेत्र विकास आराखडा शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत

(४८) * ३३४३९ श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८२१ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरासभोवतालच्या २६ गावांचा झालर क्षेत्र विकास आराखडा शासनाकडे गत सहा महिन्यापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखडयास मान्यता देऊन औरंगाबाद शहरासह २६ गावांचा विकास करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) औरंगाबाद झालर क्षेत्राची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम २८(४) अन्वये प्रसिद्ध न करता दि.२/७/२०१४ रोजी शासनास मंजूरी करिता सादर केलेली होती.

सदर प्रारूप विकास योजनेतील फेरबदलाबाबत उक्त अधिनियमातील कलम २८(४) अन्वये प्रसिद्ध करणे आवश्यक असल्यामुळे शासनाने दि.१८/१२/२०१५ व दि.२२/३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रारूप विकास योजनेतील फेरबदल कलम २८(४) अन्वये प्रसिद्ध करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानंतर सिडकोने सदर प्रारूप विकास योजनेतील फेरबदल कलम २८(४) अन्वये प्रसिद्ध करून शासनास दि. २१/६/२०१६ रोजी कलम ३० अन्वये मंजूरी करिता सादर केली आहे.

सदर प्रारुप विकास योजनेवर शासनाकडील छाननी समितीची बैठक दि. ०१/०९/२०१६ रोजी औरंगाबाद येथे पार पडली असुन सदर प्रारूप विकास योजना छाननी समितीच्या शिफारसीसह शासनास अंतिम मंजूरीस्तव सादर करण्यात आलेली आहे.

(३) सदर प्रारुप विकास योजनावर रिट याचिका क्र. ४४७२/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाचे दि.२८/११/२०१४ रोजीच्या निर्णयामध्ये सदर विकास योजना मा.उच्च न्यायालयाच्या परवानगी शिवाय अंतिम करण्यात येऊ नये, असे आदेश पारीत केले आहेत.

सदरहू याचिकेवर दि.०५/०२/२०१७ रोजी सहसंचालक, नगर रचना औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी मा.उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले असून उक्त विकास योजनेस अंतिम मान्यता देण्यास अनुमती अपेक्षिलेली आहे. सदर याचिकेवरील मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णय होणे बाकी आहे.

बेला (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील हरिदर्शन कन्स्ट्रक्शन कंपनीने आदिवासी मजुरांची मजुरी न दिल्याबाबत

(४९) * **३२८२६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेला (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील आदिवासी मजुरांना हरिदर्शन कन्स्ट्रक्शन कंपनी, यवतमाळच्या संचालकांनी रस्त्याच्या कामावर नेऊन काम केल्यानंतर मजुरी देण्यास टाळाटाळ करीत असल्याची घटना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मजुरांनी पैशांची मागणी केली असता कंपनीचे संचालक श्री.एस.एस.खडालोहिया यांनी रकमेचा धनादेश दिला परंतु, बँकेच्या खात्यात रक्कम नसल्याने धनादेश वटला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संचालकांकडे रोख रक्कमेची मागणी केल्यानंतर संचालकांनी मजुरांना धमकाविल्याचा प्रकारही घडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने उक्त कंपनीवर कारवाई करून मजुरांना त्यांची मजुरी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. कामगाराच्या तक्रारीअंती सदर बाब निदर्शनास आली.
(३) व (४) सदर प्रकरणामध्ये दि.२१/७/२०१७ रोजी तोडगा काढण्याच्यादृष्टीने मे.हरिदर्शन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.या व्यवस्थापनाकडे चौकशी केली असता श्री.अनिल चौबे, पार्टनर यांनी सांगितले की कंपनीने तक्रारकर्ते १७ कामगारांना एकूण रु.१,१५,०००/- दि.२५/३/२०१७ रोजी वाटप केले आहेत. संबंधित १७ कामगारांनी त्यांना मजूरी मिळाली असून आता कंपनीकडून कोणतीही मजूरी घेणे बाकी नाही अशा आशयाबाबतचा मजकूर रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर लिहून दिला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील बाजार पुलाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(५०) * ३२३९७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील बाजार पुलाच्या कामात सुमारे ८० लाख रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मा.पालकमंत्री यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बाजार पुलाच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे माहे मार्च, २०१७ मध्ये प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांना उक्त बाबींचे चौकशी करण्याचे आदेश दिनांक ०१/०४/२०१७ रोजी दिलेले असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग चिपळूण यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

याशिवाय नगरपरिषदेने सदर कामाचे त्रयस्त यंत्रणेमार्फत परिक्षण करण्याबाबत अधिक्षक अभियंता, संकल्प चित्र मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य पोलीस समिती सदस्यांच्या मागण्यांबाबत

(५१) * ३०९८३ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २६८५७ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पोलीस पत्नी समिती सदस्य प्रतिनिधींनी प्रामुख्याने पोलिसांना हक्काची घरे देण्याबाबत, अनुकंपा पोलीस भरती लवकरात लवकर करण्याबाबत, पोलिसांच्या एका मुलास पोलीस सेवेत सामावून घेण्याबाबत, तसेच पोलीस व पोलीस कुटुंबियांना सर्व आजारांवर वैद्यकीय सुविधा बिनशर्त व मोफत मिळण्याबाबत, पोलीस सोसायटीकडून अल्प व्याज दरात गृह कर्ज मिळण्याबाबत, पुरुष पोलीस अंमलदारांना पत्नीच्या प्रसुतीनंतर बालसंगोपन व पालकत्व रजा ४५ दिवस देण्याबाबत इत्यादी मागण्यांचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागण्यांच्या पुर्ततेसंदर्भात समिती सदस्यांनी गतवर्षी आझाद मैदान, मुंबई येथे व माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान ठाणे येथे उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक १८/०४/२०१७ रोजी शासकीय विश्रामगृह, ठाणे येथे पोलीसांच्या विविध मागण्यांसाठी एक दिवसीय धरणे आदोलन करण्यात आले होते. परंतु उपोषण केलेले नव्हते. पोलीसांना हक्काची घरे मिळण्याबाबत वित्त विभागाच्या दिनांक २०/०२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मूळ पगाराच्या २०० पट इतकी घर बांधणी अग्रीम मंजूर करण्यात येते. तसेच पोलीसांना स्वतःची घरे घेणेकरिता

बँकामार्फत गृहकर्ज उपलब्ध होणेकरिता कार्यवाही सुरू आहे. सेवेत असताना मयत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या एका पात्र वारसास अनुकंपा तत्वावर गट-क व गट-ड या संवर्गात शासकीय सेवेत घेण्यात येते. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना पोलीस भरतीमध्ये ५ टक्के आरक्षण विहीत केले आहे. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना याखाली २७ आकस्मिक व ५ गंभीर अशा ३२ आजारांवर आंतररुग्णालयीन उपचार विनामूल्य देण्यात येते. ४५ वर्षे वयावरील पोलीस कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणी करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव शहरातील साफसफाईच्या कामाबाबत

(५२) * **३४२१३ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरातील २२ प्रभागात सफाईसाठी कंत्राट दिलेले असताना प्रत्यक्षात या प्रभागातील अनेक वसाहतींमध्ये तसेच गावातही विविध ठिकाणी कच-याचे ढीग पडून असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सफाईकरिता ६५ ते ७० लाख रुपयांचे कंत्राट देवून सुध्दा परिसरात स्वच्छता होत नाही याकडे महानगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सफाईच्या कामात सुसूत्रता आणण्यासाठी व सफाईच्या कंत्राटाच्या नावाखाली सुरु असलेला गैरकारभार थांबविण्यासाठी हे कंत्राटच रद्द करण्यात येणार काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे नाही.

जळगाव शहरात एकूण ३७ प्रभाग असून, त्यापैकी १५ प्रभागातील साफसफाई महानगरपालिकेच्या नियमित कर्मचाऱ्यांमार्फत, तसेच २२ प्रभागातील साफसफाई कंत्राटदारांमार्फत करण्यात येत आहे.

या कामासाठी महानगरपालिकेस दरमहा रु.६७.५८ लक्ष खर्च येतो.

शहरातील साफसफाईच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- शहरातील कचरा महानगरपालिकेच्या वाहतुक करणाऱ्या सर्व घंटागाड्यांवर जीपीएस प्रणाली कार्यान्वित केली असून, त्याव्दारे प्रशासनामार्फत देखरेख ठेवण्यात येते.
- याशिवाय ३७ प्रभागांमध्ये स्वच्छता दूत, तपासणी पथक यांचेमार्फत साफसफाईच्या कामावर नियंत्रण ठेवण्यात येते.
- स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत व महानगरपालिकेमार्फत स्वतंत्र स्मार्ट सिटी ॲप सुरु करण्यात आले असून, त्याव्दारे, तसेच स्वच्छतेबाबत नागरीकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचे वेळीच निराकरण करण्यात येते.

(३) करारनाम्यातील अटी-शर्तींचा भंग झाल्याच्या कारणास्तव दोन प्रभागांतील साफसफाईचा मक्ता दि.१०/७/२०१७ रोजी रद्द करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे ०७ प्रभागात कंत्राटदाराचे काम असमाधानकारक असल्याने महानगरपालिकेमार्फत संबंधितांना मक्ता रद्द करण्यासंदर्भात दि.११/०७/२०१७ रोजी अंतिम नोटीस बजावण्यात आली आहे.

साफसफाईच्या कामात त्रुटी आढळल्यास संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील रहिवाशांच्या मूळ कागदपत्रांची नस्ती गहाळ झाल्याबाबत

(५३) * **३३४९१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबिरात वर्षानुवर्षे वास्तव्याला असलेल्या रहिवाशांच्या उपकर प्राप्त इमारतींमधील वास्तव्याच्या मूळ कागदपत्रांची नस्ती म्हाडाकडून गहाळ झाल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नस्ती गहाळ झाल्याने म्हाडाच्या पुनर्रचित इमारतीमध्ये नवीन घरे मिळण्याच्या हक्कापासून असंख्य रहिवाशी वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार म्हाडाच्या पुनर्रचित इमारतीमध्ये नवीन घरे मिळण्याच्या हक्कापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

दि.२७/०२/२०१३ व दि.२२/१०/२०१३ रोजीच्या जाहिरातीस अनुसरुन १४९७ अर्ज प्राप्त झाले होते. सदर १४९७ प्राप्त अर्जांवर निर्णय घेऊन प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार ११५१ अर्जदारांना अपात्र करण्यात आले. तसेच ३४६ अर्जदारांना पात्र करण्यात येऊन गाळे वितरण करण्यात आले. अपात्र अर्जदारांपैंकी केवळ ३६ प्रकरणे मूळ कागदपत्रे नसल्याने अपात्र करण्यात आली आहेत.

(३) व (४) सदर मूळ कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी म्हाडा कार्यालयामध्ये व क्षेत्रीय कार्यालयामध्ये सन २०१४ मध्ये शोध मोहिम राबविण्यात आली असता ८० अर्जदारांपैंकी १२ प्रकरणांची मूळ कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. तसेच सदर प्रकरणी समितीद्वारे या कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फत तसेच क्षेत्रीय कार्यालयामार्फत नस्तींचा शोध घेण्याची मोहिम सुरु आहे. उर्वरित ३६ प्रकरणांपैकी मूळ नस्ती आढळून आल्यास समितीद्वारे पात्र/अपात्रतेचा फेरआढावा घेण्याची तरतूद ठेवली आहे.

परळी, माजलगाव व बीड नगरपालिकेतील कर्मचारी व कामगारांच्या विविध मागण्यांबाबत

(५४) * **३३९८४ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील परळी, माजलगाव व बीड नगरपालिकेतील सफाई कामगार, घंटागाडी कामगार, अग्निशमन दल व पाणीपुरवठा विभाग यांच्या विविध समस्येबाबत तसेच बीड नगरपालिकेतील कर्मचारी व कामगारांना नगरपालिकेचे सभापती व नगरसेवकांकडून मारहाण करणे, धमकी देणे व कामात अडथळा आणला जात असल्याने नगरपालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिका कर्मचा-यांच्या विविध मागण्यांबाबत व कर्मचारी व कामगारांना धमकी देणाऱ्यांवर शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) जिल्हाधिकारी, बीड यांनी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांचेत सुसंवाद व समन्वय साधण्याच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधितांची बैठक आयोजित करण्याचे निर्देश नगराध्यक्ष व मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड यांना दिले आहेत.

तसेच, जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १९ जुलै २०१७ रोजी कामगारांच्या विविध मागण्यांबाबत संबधित कामगार संघटना व परळी, माजलगाव व बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांची संयुक्त बैठक घेतली. सदर बैठकीत कामगारांच्या मागण्यांबाबत नियमानुरूप कार्यवाही करण्याचे निर्देश संबधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) येथील आरक्षित जागेवर स्मशानभूमी व अग्निशमन केंद्र विकसित करण्याबाबत

(५५) * **३२८३२ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) येथे महानगरपालिकेतर्फे स्मशानभूमी व अग्निशमन केंद्र करिता भूखंड आरक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदिवली (पूर्व) येथील वाढत्या लोकसंख्येनुसार आरक्षित जागेवर स्मशानभूमी व अग्निशमन केंद्र विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) शासनाने मंजूर केलेल्या सुधारीत मंजूर विकास आराखडा १९९३ नुसार ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) या ठिकाणी स्मशानभूमी व अग्निशमन केंद्राकरिता भूखंड आरक्षित आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर आरक्षित जागेवर अग्निशमन केंद्र विकसित करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

- ठाकूर व्हिलेज येथील न.भू.क्र.८०९ ए/१/६ मौजे पोईसर येथील १०,६००.९० चौ.मी. चा भूखंड अग्निशमन केंद्रासाठी राखीव असून तो हस्तांतरणीय विकास हक्कांतर्गत दिनांक २०/०२/२००२ रोजी महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात आला आहे.

- सदर भूखंडाच्या मालमत्ता पत्रकावर सन २००६ पासून “खाजगी वने” अशी सन असलेली नोंद सन २०१५ साली रद्द करण्यात आली आहे.
- पूर्ण क्षमतेच्या मोठया अग्निशमन केंद्रासाठी आराखडे मंजुर करण्यात आले असून, सदर कामासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु. १ कोटी इतक्या रकमेची तरतुद करण्यात आली आहे.
- तथापि, सदर भूखंडावर तात्पुरत्या स्वरुपात मिनी फायर स्टेशन सुरु करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

ठाकूर व्हिलेज, कांदिवली येथील न.भू.क्र. ८०९ए/१/१९ए/१/१/१सी/१, ८७४ डी/२ (भाग) व ८०९ ए/१/१९ए/१/१/१/१ए (भाग) मौजे पोईसर हे ३ भूखंड सुधारीत मंजुर विकास नियोजन आराखडा सन १९९३ अन्वये, स्मशानभूमीसाठी आरक्षित असून सद्य:स्थितीत सदर भूखंडांवर खालील कारणास्तव स्मशानभूमी विकसित करणे महानगरपालिकेस शक्य झालेले नाही:-

- सदर भूखंडाच्या मालमत्ता पत्रकावर असलेली “खाजगी वने” अशी नोंद सन २०१५ मध्ये वगळली असली तरी सदर भूखंड संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीलगत असून, पर्यावरण संवेदन क्षेत्राने बाधित असल्यामुळे सदर भूखंड संपादीत करणे महानगरपालिकेस शक्य झाले नाही.
- सन २०१४-३४ च्या प्रारुप विकास आराखडयात, उपरोक्त भूखंडांवर स्मशानभूमीचे आरक्षण दर्शविण्यात आलेले आहे. तथापि, सदर भूखंडावरील स्मशानभूमीचे आरक्षण वगळण्याबाबत हरकती व सूचना प्राप्त झाल्यानंतर, स्मशानभूमीचे आरक्षण वगळून तेथे परवडणारी घरे व बेघरांसाठी निवारा असे आरक्षण प्रस्तावित करण्याची शिफारस शासनाच्या नियोजन समितीमार्फत महानगरपालिकेस करण्यात आली आहे.

भायखळा (मुंबई) येथील वीरमाता जिजाबाई उदयान व प्राणीसंग्रहालयाचे प्रवेश शुल्क कमी करण्याबाबत

(५६) * ३१३८६ श्री.नारायण राणे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील वीरमाता जिजाबाई उदयान व प्राणिसंग्रहालयाचे प्रवेश शुल्क वाढविण्यास सेव्ह राणीबाग समिती तसेच सर्वस्तरावरुन विरोध केला जात असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त समितीने मा.मुख्यमंत्री यांना पत्र लिहून शुल्क वाढ न करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राणीबागेत सोयीसुविधा नसतानाही सदरील प्रवेश दरवाढ ही पर्यटक व नागरिकांवर अन्यायकारक असल्याने शासनाने राणीबागेतील प्रवेश शुल्क कमी करण्याबाबत व याठिकाणी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) भायखळा येथील राणीबागेचे प्रवेश शुल्क वाढविल्याबाबत माहे मे, २०१७ मध्ये विविध स्थानिक वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) सेव्ह राणीबाग समितीने दिनांक ०२ मे, २०१७ रोजीच्या पत्रान्वये शुल्कवाढ न करण्याबाबत मा. महापौर यांना विनंती केली आहे.

(३) व (४) महानगरपालिकेमार्फत राणी बागेतील प्रवेश शुल्क अद्यापि वाढविण्यात आलेले नाही. तथापि, सदर शुल्कवाढ दिनांक १ ऑगस्ट, २०१७ पासून लागू होणार आहे.

सदर ठिकाणी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

- प्राणीसंग्रहालयाच्या प्रवेशद्वाराजवळ इलेक्ट्रॉनिक प्रवेशयंत्रणा, तिकिटघर, प्याऊ, प्रसाधनगृह, सोव्हेनिअर शॉप, क्लॉक रुम, सी.सी.टी.व्ही. कॅमेरा इत्यादी सुविधा अंतर्भुत असलेला नव्याने एन्ट्री प्लाझा विकसित करण्यात आला आहे.
- उद्यान परिसरांतर्गत एकूण ६३ हरितबागा विकसित करण्यात आल्या असून अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण, परिसरातील पुरातन वास्तुंचे जतन व संवर्धन इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली आहेत.
- नागरिकांच्या माहितीकरिता उद्यान परिसरातील सर्व झाडांवर नामफलक तसेच क्रमांक देण्यात आले आहेत.
- प्राणिसंग्रहालयामध्ये जागोजागी दिशादर्शक तसेच माहितीफलक लावण्यात आले आहेत.
- नागरिकांकरिता ७ ठिकाणी विविध सेल्फी पॉईंट व दोन कृत्रिम स्वरुपाचे धबधबे विकसित करण्यात आले आहेत.
- उद्यान परिसरामध्ये एन्ट्री प्लाझाजवळ व पेंग्विन कक्षाबाहेर नागरिकांच्या वापराकरिता (पुरुष व स्त्री) प्रत्येकी एक प्रसाधनृह उभारण्यात आले आहे व एका प्रसाधनगृहाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

- उद्यान परिसरात ४ ठिकाणी थंड पाण्याच्या व ४ ठिकाणी साध्या पाण्याच्या पाणपोया उपलब्ध करण्यात आल्या आहेत.
- प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामध्ये अद्ययावत वातानुकुलित हम्बोल्ट पेंग्वीन कक्षाची उभारणी करून तो नागरिकांकरिता खुला करण्यात आला आहे. सदर कक्षामध्ये दृकश्राव्य माध्यमाद्वारे सूचना देण्याकरिता नवीन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.
- पावसाकरिता निवारास्थाने, फुड किऑस्क्स इ. नागरी सुविधादेखील नागरिकांच्या सोयीकरिता बांधण्यात येत आहेत.
- संपूर्ण परिसरात नव्याने पाणीपुरवठा यंत्रणा उभारुन ती कार्यान्वित करण्यात येत आहे.
- सदर सर्व सोयीसुविधांचे योग्य रितीने व्यवस्थापन व स्वच्छता करण्याच्या दृष्टीने हाऊसकिपिंग एजन्सी नेमण्यात आली आहे.

उपरोक्त सर्व कामे प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामध्ये पूर्ण करण्यात आली असून, दुसऱ्या टप्प्यांतर्गत महानगरपालिकेमार्फत पुढील कामे करण्यात येत आहेत :-

- प्राणिसंग्रहालयाच्या मंजुर बृहत् आराखडयानुसार नव्याने येणाऱ्या प्राण्यांकरिता पिंजरे / आवासस्थाने बांधण्यात येणार असून त्याची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
- सदर ठिकाणी सी.सी.टी.व्ही. नेटवर्क उभारण्यात येणार असून त्याबाबतची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

मुंबईत खाजगी सुरक्षारक्षक पुरविणाऱ्या कंपन्यातील सुरक्षा रक्षकांना परवानगी नसताना प्रशिक्षण दिल्याबाबत

(५७) * ३३१६४ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत खाजगी सुरक्षारक्षक पुरविणाऱ्या जीफोरएस व बीआयएस या दोन अग्रगण्य कंपन्यानी विविध ठिकाणी नेमलेल्या सुरक्षारक्षकांना परवानगी नसताना प्रशिक्षण दिल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरक्षारक्षकांना बेकायदेशीरपणे प्रशिक्षण दिल्याप्रकरणी खासगी सुरक्षा यंत्रणा अधिनियम (पसारा), २००५ चे उल्लंघन केल्याप्रकरणी सदर कंपन्यांना नोटीस बजावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तूत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार उक्त दोषी कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे आहे.

(३) खाजगी सुरक्षा संस्था (नियमन) अधिनियम,२००५ च्या नियम क्र.२० अन्वये कारवाई का करण्यात येवू नये याबाबतची कारणे दाखवा नोटीस महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून जीफोरएस व बीआयएस या संस्थांना बजविण्यात आली आहे. तथापि, यापैकी जीफोरएस या संस्थेचा खुलासा प्राप्त झाला असून बीआयएस या संस्थेने प्रस्तावित कारवाईविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली आहे. त्यावर मा.उच्च न्यायालयाने दि. ९ जून, २०१७ च्या आदेशान्वये प्रस्तावित कारवाईस पुढील आदेशापर्यंत अंतरिम स्थगिती दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई सेंट्रल येथील महापालिकेच्या नायर धर्मादाय रुग्णालयातील वैदयकीय उपकरणे जळाल्याबाबत

(५८) * ३३८०२ श्री.जनार्दन चांदूरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई सेंट्रल येथील महापालिकेच्या बी.वाय.एल. नायर धर्मादाय रुग्णालयातील कान, नाक, घसा आणि ऑडिओ व स्पीच थेरेपी विभागाला लागलेल्या आगीत सुमारे १ कोटींची वैदयकीय उपकरणे जळाली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी येथे आवश्यक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मुंबई सेंट्रल येथील महानगरपालिकेच्या बी.वाय.एल.नायर रुग्णालयाच्या ईएनटी आणि ऑडिओलॉजी व स्पीच थेरपी विभागाला दिनांक ०४/०५/२०१७ रोजी लागलेल्या आगीत ईएनटी विभागातील रु.५७ लाख किंमतीची व ऑडिओलॉजी व स्पीच थेरपी विभागाची साधारणत: रु.१.३ कोटी किंमतीची वेगवेगळी वैद्यकीय उपकरणे अशी एकूण रु.१.८७ कोटीची उपकरणे जळाली ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर आगीची महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचे आढळून आले.

तथापि, रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

- ऑडिओलॉजी व स्पीच थेरपी विभागास सदर रुग्णालयाच्या ओ.पी.डी. इमारतीत तात्पुरती जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- रुग्णांची एबीआर (ABR) चाचणी सदर ओ.पी.डी. इमारतीत सुरु करण्यात येणार आहे.
- ऑडिओलॉजी रुग्णांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इतर रुग्णालयांत व शासकीय रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात येत आहे.
- ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरपी काही प्रमाणात सुरु आहे.
- प्युर टोन ऑडियोमेट्री (Pure Tone Audiometry) तपासासाठी अत्यावश्यक साऊंड ट्रिटेड बुथ (Sound Treated Booth) प्राप्त करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
- सदर विभागासाठी नवीन उपकरणे खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरु आहे.

नाशिक जिल्हयातील एका शेतकऱ्याची जमीन विक्रीची रक्कम बँक खात्यातून गहाळ झाल्याबाबत

(५९) * ३१३७० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात कॅशलेस इंडियाच्या माध्यमातून सर्व व्यवहार ऑनलाईन करण्यासाठी मा.पंतप्रधानांनी आवाहन केले असून या ऑनलाईन व्यवहाराचा सर्वसामान्य नागरिकांस, शेतक-यांस फटका बसत असून नाशिक जिल्हयातील एका शेतकऱ्या चे जमीन विक्रीचे रुपये २२ लाख ७५ हजार बँक खात्यातून गहाळ झाले असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील शेतक-याने अंदरानगर पोलीस ठाण्यात संशयितांच्या विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील ऑनलाईन प्रक्रिया ही सर्वसामान्य जनतेला व मुख्यत: शेतक-यांसाठी धोकादायक असून त्यांना त्यांचे पैसे परत मिळविण्यासाठी रोजगार सोडून हालअपेष्टांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच ऑनलाइनद्वारे बँक खात्यातून पैसे पळविणा-या टोळीवर निर्बंध आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) नाशिक येथील शेतकरी जयसिंग लक्ष्मण ढेमसे रा.पाथर्डीगांव, गौळाणेरोडे नाशिक यांनी स्वत: कुठल्याही प्रकारे ऑनलाईन व्यवहार केलेला नसून त्यांचे रुपये ५०,८०,२७४/- ही आयसीआय बँकेत जमा असतांना दिनांक १०/१२/२०१६ ते दिनांक १०/०४/२०१७ या कालावधीत श्री.ढेमसे यांच्या खात्यावरील रुपये २२,७४,०९०/- आरोपीतांनी ऑनलाइन पध्दतीने स्वत:चे अकाऊंटवर ट्रान्सफर करुन फसवणूक केली आहे. पोलीस आयुक्तालय नाशिक शहर कडील इंदिरानगर पोलीस स्टेशन गु.र.रं ९९/२०१७ भादंविक ४२०, ३४ माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (क), ६६ (ड) प्रमाणे दिनांक २४/४/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) व (४) सायबर सेलच्या मदतीने बारकाईने तपास करुन त्यातील आरोपी अवधेशकुमार सिंग राज्य-बिहार, अतानु अनिलचंद्र चक्रवर्ती राज्य- आसाम,व्यास गुलाब यादव राज्य-बिहार यातील आरोपी क्र.२ व ३ यांना अटक करण्यात आली असून सर्व आरोपींची बँक खाती सिल करण्यात आली आहेत. तसेच त्यांचेकडून रु.३,५८,९४५/- इतकी रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

(६०) * ३१७८६ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक २६७८९ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना कंत्राटी तत्वावर शासन सेवेत सामावून घ्यावे किंवा कसे याबाबत प्रशासकीय, वित्तीय व विधी विषयक बाबीसंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग व विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) होय, हे अंशत: खरे आहे. सदर प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करण्यात आला होता.

(२) व (३) पुढील कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.

माळशिरस (जि.सोलापूर) नगरपंचायत अंतर्गत महात्मा फुलेनगर येथे सोयीसुविधा उपलब्ध करणेबाबत

(६१) * ३३५५५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये महात्मा फुलेनगर येथे सन १९९० पासून अनेक नागरिक गावठाणात राहात आहेत परंतु, अदयाप याठिकाणी कुठल्याही सोयीसुविधा उपलब्ध नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी घरपट्टी आणि पाणीपट्टी भरुनही या नागरिकांच्या जागेची नोंद नगरपंचायतीत झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील जागेच्या नोंदी कधी पूर्ण करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१)

- माळशिरस नगरपंचायतीची स्थापना दि. ११/०९/२०१५ रोजी करण्यात आली आहे. माळशिरस नगरपंचायतीच्या अहवालानुसार महात्मा फुलेनगर या भागात सुमारे २३१ कुटूंबे राहतात.
- सदर वसाहतीमध्ये रस्ते दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याच्या पाईप दुरुस्तीचे काम, खांबावरील पथदिवे बसविण्याचे काम, हातपंप दुरुस्तीचे काम इत्यादी सेवासुविधा नगरपंचायतीकडून पुरविल्या जातात.
- सदर वसाहतीतील २२७ कुटूंबांना स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक शौचालय अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(२) व (३) माळशिरस नगरपंचायत स्थापनेनंतर मालमत्ता कर आकारणी सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. सदर जागा शासनाच्या मालकीची असल्याने नगरपंचायत दप्तरी तेथील नागरिकांची भोगवटादार म्हणून नोंदी घेण्यात आल्या आहेत. त्यानुसार सदर नागरिकांना कर देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भूम (जि.उस्मानाबाद) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मूलभूत सुविधा पुरविणेबाबत

(६२) * ३४०८४ श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम (जि.उस्मानाबाद) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) वीज, पाणी इत्यादी मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संस्थेत विविध ठिकाणाहून विद्यार्थी प्रशिक्षण घेण्यासाठी येत असतात परंतु, त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) अंशत: खरे आहे.

संस्थेचा पाणीपुरवठा विंधन विहीरीतून होत असून जून, २०१७ मध्ये अवर्षणामुळे विंधन विहीरीतील पाणीसाठा संपला होता. तथापि, सदर कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

संस्थेची विद्युत जोडणी ग्रामीण फिडरला जोडलेली असल्याने विद्युत पुरवठा लोडशेडींगमुळे विद्युत विभागाच्या वेळापत्रकानुसार काही तास बंद असतो.

(२) हे खरे नाही.

प्रशिक्षणार्थ्यांना संस्थास्तरावरुन आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

अवर्षण काळात पाण्याची अडचण होती. परंतु, सद्य:स्थितीत पाण्याची अडचण नाही.

विद्युत पुरवठा शहरी फिडरमधून करण्यासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे संस्थास्तरावरुन पाठपुरावा सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईच्या प्रादेशिक विकास आराखडयाबाबत

(६३) * ३२६४२ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एमएमआरडीएच्या अधिका-यांनी महापालिकेला न विचारता, नागरिकांची मते विचारात न घेता प्रादेशिक विकास आराखडा तयार केला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विकास आराखडयात ग्रीन झोन १ व २ मध्ये अतिधोकादायक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई परिसरासह पालघर, रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील प्रारुप आराखड्यावर आलेल्या ६० हजार हरकतींवर सुनावणी घेण्यास एम.एम.आर.डी.ए. ला अपयश आले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिका-यांवर कारवाई करुन सदरील विकास आराखडा रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदी अंतर्गत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशासाठी प्रारुप प्रादेशिक योजना, २०१६-३६ तयार केली असून, मुंबई महानगर नियोजन समितीने त्यास मान्यता दिली आहे. सदर प्रादेशिक योजना मुंबई महानगर प्रदेशातील सर्व महानगरपालिका / नगरपालिका तसेच संबंधित शासनाचे विभाग, इतर पायाभूत सुविधा पुरविणा-या संस्था, नियोजन प्राधिकरणे, शासकीय व अशासकीय संस्था, इत्यादी यांच्यासोबत बैठक घेऊन सल्लामसलत करुन तयार करण्यात आली.

(२) प्रारुप विकास नियंत्रण नियमावली, २०१६-३६ नुसार हरीत-१ भूवापर विभागामधील १० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या जमिनीचा वापर सर्व प्रकारचे उद्योग जेथे प्रस्तावित पायाभूत सुविधा, औदयोगिक सांडपाणी प्रक्रिया आणि आपत्कालिन व्यवस्था इत्यादी महाराष्ट्र औदयोगिक महामंडळाच्या औदयोगिक क्षेत्राप्रमाणे असल्याबाबत महाराष्ट्र औदयोगिक महामंडळ सहमती असेल तेथे अनुज्ञेय आहे. परंतु, हरित-२ भूवापर विभागातील जमिनीचा वापर फक्त शेती आधारीत उद्योगांसाठी अनुज्ञेय आहे.

(३) सदर प्रारुप प्रादेशिक योजनेवर सुमारे ६३,००० हरकती/सुचना प्राप्त झाल्या आहेत. सर्व हरकतदारांना नियोजन समितीने सुनावणी दिली आहे. या व्यतिरिक्त काही क्षेत्रातील नागरीकांनी त्यांचे परीसरात येवून सुनावणी देण्याची विनंती प्राधिकरणास केली असून, त्यास अनुसरुन प्राधिकरण संबंधित नियोजन समिती मार्फत त्या त्या क्षेत्रामध्ये सुनावणी प्रक्रिया पूर्ण करणार आहे.

(४) सदर प्रारुप प्रादेशिक योजना शासनास मंजूरीकरीता सादर झाल्यानंतर अधिनियमातील तरतुदीनुसार त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दारव्हा (जि.यवतमाळ) नगरपरिषदेत कचरा गोळा करण्याच्या कंत्राटामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

(६४) * **३४११६** **श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा (जि.यवतमाळ) नगरपरिषदेत कचरा गोळा करण्याच्या कंत्राटामध्ये गैरव्यवहार झाल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाच्या निविदेमध्ये अंत:स्थ हेतूने कमी दराच्या निविदाधारकाला डावलून जास्त दराच्या निविदाधारकाला कंत्राट दिले गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली आहे काय, तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) मुख्याधिकारी, दारव्हा यांच्या अहवालानुसार कचरा गोळा करण्याच्या कामाबाबत मार्च, २०१७ मध्ये ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी कमी दराची पात्र निविदा दि.१६/०५/२०१७ रोजीच्या नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आली. याबाबत, कोणताही गैरव्यवहार झाल्याचे निर्देशनास आले नसल्याचे मुख्याधिकारी, दारव्हा यांनी कळविले आहे.

(३) जिल्हाधिकारी यवतमाळ यांना या प्रकरणी तारांकित प्रश्नांच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत दि.२१/०७/२०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण (जि.ठाणे) शहरात कामगार कल्याण भवन बांधण्याबाबत

(६५) * ३१२५३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) शहरातील मौजे बारावे सर्व्हे क्र. ६२ वरील २२ गुंठे शासकीय भूखंड महसूल विभागाने पत्र क्र. जमीन-२७७२/प्र.क्र.४५/ज-४ नुसार माहे फेब्रुवारी, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान कामगार कल्याण भवन बांधण्यासाठी कामगार विभागास वर्ग केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासकीय भूखंडावर कामगार कल्याण भवनाच्या फलकाचे अनावरण माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष व कामगार राज्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण शहरातील कामगार व त्यांच्या परिवाराला अनेक योजनांचा लाभ मिळण्यासाठी सदरहू शासकीय भूखंडावर प्रस्तावित कामगार कल्याण भवन बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) होय, हे खरे आहे .

(२) होय, हे खरे आहे.

(३) कल्याण आयुक्त यांचेकडून सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे. अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रस्ताव विचाराधीन आहे.

पुणे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याबाबत

(६६) * ३०९८७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक २७४४७ ला दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:

सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यासाठी योग्य जागेची निवड करण्याकरिता राज्य शासन व भारतीय विमान प्राधिकरण यांचेमार्फत दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पुणे जिल्हयातील विविध ठिकाणच्या जागांची पहाणी करण्यात आली असून त्यापैकी मुंजेवाडी-पारगाव मेमाणे (site ९A) (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील ठिकाण विमानतळासाठी योग्य असल्याचे मत नोंदविण्यात आले असून त्याबाबतचा अहवाल राज्य शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे आणि “Detailed Techno Economic Feasibility Study” बाबतच्या कार्यवाहीसाठी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक सल्लागार समिती Technical Advisory Committee नेमण्यात आली असून या समितीत सिडको, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, मिहान इंडिया लि. व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे प्रतिनिधी सदस्य आहेत व सदर समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त समितीचा अहवाल प्राप्त होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) तांत्रिक सल्लागार समितीच्या शिफारशीनुसार Detailed Techno Economic Feasibility Study (TEFS) करण्याकरिता Dorsch Holding GmbH, Germany यांची मार्च, २०१७ मध्ये सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या सल्लागाराचे काम प्रगतीपथावर असून TEFS अहवाल मिळण्याकरिता ६ महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहर व उपनगरातील दरडीलगत असणा-या झोपडयांच्या सुरक्षेबाबत

(६७) * ३२५५० श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :

सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील ३२७ ठिकाणांवरील २२ हजार ४८३ झोपडयांना दरड कोसळण्याचा धोका असून सदर दरडीलगत असणा-या झोपडपट्टीतील रहिवाशांच्या जिवितास त्यापासून धोका असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील दरडीलगत असणा-या झोपडयांच्या सुरक्षेबाबत महानगरपालिकेसह जिल्हाधिकारी कार्यालय उचित कार्यवाही करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त जिवितहानी टाळण्यासाठी व त्या रहिवाशांच्या सुरक्षतेचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर विभागात ३६, पश्चिम उपनगरात ३१ आणि पूर्व उपनगरात २२० अशी एकूण २८७ ठिकाणे दरडी कोसळण्याची संभाव्य ठिकाणे म्हणून घोषित करण्यात आलेली आहेत.

सदर दरडींलगत असणाऱ्या झोपडयांच्या सुरक्षेबाबत महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते:-

- दरडी कोसळण्याच्या संभाव्य ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना नोटीसा बजावल्या जातात.

- दरड कोसळण्याच्या पार्श्वभूमीवर काय करावे व काय करु नये याबाबतच्या सूचना, आणीबाणी संपर्क क्रमांक, दरडी कोसळण्याच्या ठिकाणापासून जवळ असणारे तात्पुरते निवारे याबाबतची माहिती दर्शविणारे फलक नागरिकांना दिसतील अशाप्रकारे दरडी कोसळण्याच्या संभाव्य ठिकाणी लावले जातात.
- मुंबई शहर व उपनगरात दरडी कोसळण्याच्या घटना घडल्यास, प्रभावित नागरिकांच्या तात्पुरत्या निवाऱ्याकरिता महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रशासकीय विभागात ५ महापालिका शाळा निश्चित करण्यात आल्या आहेत.
- मुंबई शहर व उपनगरातील दरडी कोसळण्याची शक्यता असलेल्या संभाव्य ७० ठिकाणांचे सन २०१७-१८ या कालावधीत टप्प्याटप्प्याने सर्वेक्षण केले जाणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वागळे इस्टेट (ठाणे) येथे अंमली पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

(६८) * **३१००६** **श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वागळे इस्टेट (ठाणे) येथील पंचपरमेश्वर ते रोड नंबर १६, तानसा पाईपलाईन लगत येथे प्रतिदिन ४०० ते ५०० महाविद्यालयीन युवक व युवती ड्रग्स, गांजा व इतर अंमलीपदार्थांचे सेवन करीत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे पोलिसांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सदर ठिकाणी असलेल्या झोपडपट्टीतून मोठ्या प्रमाणात गांजा जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणावरील अंमलीपदार्थांची विक्री केंद्र बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

दि.२२/०५/२०१७ रोजी श्रीनगर पोलीस स्टेशन अंतर्गत मॉडेल चेक नाका, वागळे इस्टेट रोड, ठाणे येथे श्री. दिलीप राघवजी रतनानी हा गांजा विक्री करण्यासाठी आला असता त्यास ताब्यात घेवून त्याचे विरूध्द श्रीनगर पोलीस स्टेशन गु.रजि.क्र. ११/२०१७ एनडीपीएस कायदा कलम ८ (क), २० प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याचे कब्जातून १५०० ग्रॅम वजनाचा गांजा हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर इसमास अटक करण्यात आली असून सदर आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या ई-लर्निंग प्रणालीबाबत

(६९) * ३२०८६ ॲड.जयदेव गायकवाड : तारांकित प्रश्न क्रमांक १५७८९ ला दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेने कोटयवधी रुपये खर्च करुन महापालिकेच्या शिक्षण मंडळाच्या १५१ शाळांमध्ये संगणक लॅब आणि स्वंयसेवी संस्थांनी बसविलेली ई-लर्निंग यंत्रणा वापरत नसताना सदर शाळेत पुन्हा नव्याने ई-लर्निंग प्रणाली आणि व्हर्च्युअल क्लासरुम बनविण्यासाठी २४ कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार सदर निधीत गैरव्यवहार होऊ नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२)

- सन २००४-०५ ते सन २०१४-१५ अखेर ३०७ शाळांमधून १३१ संगणक लॅब उभारण्यात आल्या असून संगणक लॅब व संगणक प्रशिक्षणाकरिता एकूण ४२ कोटी ३० लक्ष एवढा खर्च झालेला आहे.
- संगणक लॅबमधील काही संगणक कालबाह्य झाले असून उर्वरित सुस्थितीतील संगणकांच्या माध्यमातून शिक्षकांमार्फत प्रशिक्षण देण्यात येते.

- सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना ई-लर्निंग व्यवस्था सुरू करण्यात आली असून त्या अनुषंगाने सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षात एलईडी टिव्ही, ई-लर्निंग सॉफ्टवेअर व इतर बाबींच्या खरेदीसाठी रूपये ५ कोटी ६८ लक्ष एवढा खर्च झालेला आहे, परंतु कोणत्याही स्वयंसेवी संस्थेमार्फत ई-लर्निंग व्यवस्था बसविण्यात आलेली नाही.
- पुणे महानगरपालिकेमार्फत बसविण्यात आलेल्या ई-लर्निंग सॉफ्टवेअरची मुदत संपूष्टात आल्याने सध्या ई-लर्निंग यंत्रणा पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडे उपलब्ध नाही.
- ऑनलाईन एज्युकेशन अंतर्गत भारत संचार निगम लि. यांच्याकडून व्हर्च्युअल क्लास रूमसाठी सन २०१६-१७ मध्ये प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ई-लर्निंग यंत्रणा राबविणे, व्हर्च्युअल क्लास व तदनुषंगिक बाबींसाठी रूपये २४ कोटी ४९ लक्ष एवढ्या रकमेचा खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.
- याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश पुणे महानगरपालिकेला देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विमानतळ परिसरातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या इमारतींवर कारवाई करून त्यातील विस्थापितांचे पुनर्वसन करणेबाबत

(७०) * ३१५७५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक २५५२७ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:

सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळ परिसरातील उंचीच्या नियमांचे उल्लंघन करणा-या ४२७ इमारती आणि बांधकामे जमीनदोस्त करावीत वा त्यांची उंची कमी करावी असे आदेश दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुंबई उच्च न्यायालयाने भारतीय विमानतळ प्राधिकरण (एएआय), नागरी उड्डाण संचालनालय (डीजीसीए), मुंबई महानगरपालिका आणि अन्य नियोजन यंत्रणांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमानतळ परिसरात उंचीचे नियम डावलून बांधकाम करणा-यांना नियमबाह्य परवानगी देणा-या अधिका-यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उंच बांधकामे निष्कासित करण्यात येणार असल्याने विस्थापित होणा-यांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा त्यानुषंगाने कारवाईची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे अवलोकनात घेता भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी सन २०१०-११ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार तयार केलेल्या यादीनुसार एकंदर ११० बांधकाम प्रकरणामध्ये संचालक, नागरी उड्डाण संचालनालय यांनी नोटीसा बजावलेल्या आहेत. त्यासंदर्भात दोन महिन्याचे मुदतीमध्ये संचालक, नागरी उड्डाण संचालनालय यांनी अंतिम आदेश पारित करावेत असे आदेश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे सन २०१५-१६ मधील सर्वेक्षणासंदर्भात अशा बांधकामाची यादी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित यांनी संचालक, नागरी उड्डाण संचालनालय यांना सादर केलेली आहे. त्यासंदर्भात संचालक, नागरी उड्डाण संचालनालय यांनी तीन महिन्याच्या मुदतीमध्ये अंतिम आदेश पारित करावेत असे आदेश दिलेले आहेत. अशी बांधकामे ही हवाई वाहतूकीच्या मार्गामध्ये अडथळा ठरत असल्यास ती मालकांने अथवा नियोजन प्राधिकरणानी पाडून टाकावीत असेही आदेश दिलेले आहेत.

सदर अंतिम आदेश हे तातडीने अंमलबजावणीसाठी एअरक्राफ्ट (डिमॉलिशन ऑफ ऑब्स्ट्रक्शन कॉज्ड बाय बिल्डींग ट्रीज ॲक्ट) रुल्स १९९४ च्या खंड (vi) मधील तरतूदीनुसार जमीन मालकांसह जिल्हाधिकारी यांनाही बजावावेत असेही आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेले आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोणत्याही बांधकामासाठी परवानगी देण्याअगोदर संबंधित विमानतळ प्राधिकरणाकडून उंचीबाबत ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात येते. त्याचप्रमाणे बांधकामासाठी परवानगी देण्यात येते व त्यामध्ये कुठलेही उल्लंघन आढळून आल्यास व विमानपत्तन प्राधिकरण / नागरी उड्डाण संचालनालय यांच्याकडून महानगरपालिकेस कळविल्यास महानगरपालिकेकडून नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येते.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च् न्यायालयाचे आदेशानुसार एअरक्राफ्ट (डिमॉलिशन ऑफ ऑब्स्ट्रक्शन कॉज्ड बाय बिल्डींग ट्रीज ॲक्ट) रुल्स १९९४ अंतर्गत संचालक, नागरी उड्डाण संचालनायाकडून अंतिम कार्यवाही अभिप्रेत आहे.

गोरेगाव (मुंबई) येथील म्हाडाच्या जागेवरील पत्राचाळीच्या पुनर्विकासाबाबत

(७१) * ३१६४५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १४८५८ ला दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील म्हाडाच्या जागेवरील पत्राचाळीच्या पुनर्विकासाकरिता विकासकाबरोबर करार करताना ४० एकर जागेसाठी करार करण्यात आला परंतु, प्रत्यक्षात जागा ४७ एकर असणे, विकासकाने सन २००८ साली रहिवांश्याची घरे तोडली पण अद्याप त्यांना घरे दिली नाहीत, संक्रमण काळातील भाडे ही मिळाले नाही, विकासकाने त्याच्या हिश्याची जागा दुसऱ्याला विकणे, त्या जागेमध्ये नियमापेक्षा जास्त बांधकाम करणे तसेच म्हाडाला मिळणारी घरे ही दिली नाहीत अशा तक्रारी नंतर नेमलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला असल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अहवालाचे स्वरुप काय आहे, त्यात काय आढळुन आले तद्नुसार म्हाडाचे दोषी अधिकारी आणि विकासक यांच्यावर कारवाई करुन झालेले नुकसान वसुल करण्यात आले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्यमंत्री, गृहनिर्माण यांनी दिलेल्या आदेशानुसार अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांनी या प्रकरणी आपला अहवाल एप्रिल २०१७ मध्ये शासनास सादर केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी येथील धान्य गैरव्यवहाराबाबत

(७२) * ३३८७१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २७६३७ ला दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील कोटयवधी रूपयांच्या धान्य गैरव्यवहारात आरोपी असलेले दोन जिल्हा पुरवठा अधिकारी, दोन तहसिलदार, दोन नायब तहसिलदार तसेच अनेक मोठे व्यापारी यांना मा.न्यायालयाने जामीन नाकारूनही त्यांना अटक करण्याऐवजी पाठीशी घालण्यात येत असल्याबाबतचा आक्षेप परभणी येथील नागरिकांनी आपले सरकार या वेब पोर्टल वरून गृह विभाग, मुंबई यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नोंदविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छोटे व्यापारी व इतरांविरूध्द कारवाई करणाऱ्या पोलिसांनी अधिकारी व मोठे व्यापारी यांना पाठीशी घालत अटक न करण्याच्या भूमिकेची मंत्रालय स्तरावरून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, तांत्रिक अडचण दाखवून दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या सबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणातील गुन्हयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासात आजपर्यंत एकुण १६ आरोपी विरुध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहेत. उर्वरित आरोपी विरुध्द पुरावे प्राप्त करण्याची कार्यवाही सुरू असून, प्राप्त पुराव्याच्या अनुषंगाने उर्वरीत आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे कोणताही शासकीय अधिकारी व व्यापाऱ्यांस पाठीशी घालण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

पुणे महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांना वेतन व इतर सुविधा देणेबाबत

(७३) * ३२३५८ श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक २५६६४ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेतील खाजगी ठेकेदाराने नियुक्त सफाई कामगार, सुरक्षारक्षक व इतर कामगारांना महापालिकेकडून रक्कम मिळूनही वेतन व इतर सुविधा दिल्या नसल्याची व याकडे महानगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त कामगारांचे वेतन थकवणाऱ्या ठेकेदारांवर व त्याला साथ देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३)

- पुणे महानगरपालिकेने मे, २०१७ पूर्वीची देयके संबंधित कंत्राटदारांस अदा केल्यानंतर सदरच्या कंत्राटदारांनी कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कामगारांचे वेतन विहित कालावधीत अदा केले आहे.
- पुणे महानगरपालिकेचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक विलंबाने मंजूर झाले, तसेच काही निविदांचा कालावधी संपूष्टात आल्याने व नवीन निविदा काढण्यास विलंब लागल्याने काही ठेकेदारांना त्यांच्या कामाचे देयक देणे शक्य नव्हते, त्यामुळे एकूण १२९६ कंत्राटी कामगारांचे मे,२०१७ पासूनचे वेतन अदा करणे प्रलंबित आहे.
- अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध झाल्याने नव्याने निविदा राबविण्याची कार्यवाही सुरू असून तद्नंतर सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.
- याप्रकरणी सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना देण्यात आले आहेत.

मुंबईतील बी.आय.टी. चाळींची दुरुस्ती करणेबाबत

(७४) * ३०९६२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक २०९२१ ला दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगांव ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळी धोकादायक असल्याचे दर्शवून महानगरपालिका जबरदस्तीने सदर चाळी रिकाम्या करण्यास भाग पाडत असल्याचे व अनेक वर्षांपासून राहणाऱ्या रहिवाश्यांवर अन्याय करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीची दुरुस्ती शक्य असल्याचा दावा महानगरपालिका सभागृहातील सभागृह नेत्यांनी केला असून त्यानुसार या इमारतींची पाहणी करुन (स्ट्रक्चरल ऑडीट) स्थायी समिती समोर त्याचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहवालाचे निष्कर्ष काय आहेत व सदर इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन सदर इमारतींची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

मुंबईतील माझगाव ताडवाडी येथील महानगरपालिकेच्या एकूण १६ बी.आय.टी. चाळींपैकी १३ चाळींमधील रहिवाशांनी मे.रबरवाला डेव्हलपर्स यांच्यामार्फत दिनांक २७/०९/२००५ रोजी सादर केलेल्या पुनर्विकास प्रस्तावाला महानगरपालिकेने दिनांक ०८/०५/२००८ रोजी मान्यता दिलेली आहे.

त्यानुषंगाने विकासकास दिनांक १६/०५/२००८ रोजी इरादापत्र देण्यात आले असून, इमारतींचे निष्कासन होईपर्यंत त्या दुरुस्त करुन सुस्थितीत ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी विकासकाची आहे.

सदर १६ चाळींबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे :-

- पुनर्विकासास परवानगी दिलेल्या १३ चाळींपैकी चाळ क्र. १२ ही पूर्वीच महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आलेली आहे.
- मोडकळीस आलेली व अत्यंत धोकादायक या सी-१ वर्गवारीतील ४ चाळी (चाळ क्र. १३ ते १६) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रिकाम्या करुन निष्कासित करण्यात आल्या आहेत.
- रिक्त करुन दुरुस्ती आवश्यक या सी-२ ए वर्गवारीतील ८ चाळी (चाळ क्र. १, २, ६ ते ११) दुरुस्त करुन घेणे व सुस्थितीत ठेवण्याचे आदेश विकासकास वेळोवेळी देण्यात आलेले आहेत.
- पुनर्विकासास परवानगी न दिलेल्या ३ चाळी (चाळ क्र. ३, ४ व ५) यांची दुरुस्ती महानगरपालिकेकडून करण्यात येत असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) पुनर्विकासाची परवानगी दिलेल्या चाळ क्र. ६ व ७ मधील रहिवाशांनी महानगरपालिका सभागृह नेत्यांमार्फत स्वतंत्रपणे सादर केलेल्या संरचनात्मक अहवालानुसार या चाळींची वर्गवारी सी-२ बी म्हणजेच रिकामी न करता दुरुस्ती अशी आहे.

महानगरपालिका व रहिवाशी यांच्या संरचनात्मक परिक्षण अहवालात तफावत असल्याने तांत्रिक सल्लागार समितीस (TAC) प्रस्ताव सादर केला असता समितीने सदर बाब त्यांच्या कार्यकक्षेत येत नसल्याचे नमूद केले आहे.

सदर प्रकरणी संबंधितांशी चर्चा करुन महानगरपालिकेमार्फत पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उकरवाही (ता.उमरेड, जि.नागपूर) येथील टॉपवर्थ ऊर्जा ॲण्ड मेटल्स लिमिटेड कंपनीने कामगारांना कामावरून कमी केल्याबाबत

(७५) * ३४०३१ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक २७३३३ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उकरवाही (ता.उमरेड,जि.नागपूर) येथील टॉपवर्थ ऊर्जा ॲण्ड मेटल्स लिमिटेड या कंपनीत अनेक वर्षापासून काम करणाऱ्या नियमित ३५० कामगार व ६०० कंत्राटी कामगारांना कोणतीही पूर्व सूचना न देता कामावरून कमी केल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांना सामावून घेण्यासंबंधी शासनाने संबंधित कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) टॉपवर्थ ऊर्जा मेटल्स कंत्राटी मजदूर संघ यांच्या दिनांक ०७/०९/२०१६ च्या निवेदनानुसार सदर आस्थापनेने एस.आय.डी.आयर्न प्लॅन्ट बंद करुन कामगारांना दिनांक ०३/०८/२०१६ रोजी पासून नियमित अधिकारी व कर्मचारी कामगार ३५० आणि कंत्राटी कामगार सुमारे ६५० असे एकुण १००० अधिकारी कामावर घेणे बंद केले असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने अप्पर कामगार आयुक्त, नागपूर यांनी उभयपक्षांना दिनांक ०५/१०/२०१६ ते दिनांक ०१/०३/२०१७ या कालावधीत विविध तारखांना चर्चेकरीता बोलावून व्यवस्थापनाला कारखाना सुरु करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार दिनांक २५/०४/२०१७ पासून कारखाना पूर्ववत सुरु केलेला असून सध्या सदर कारखान्यात नियमित अधिकारी /कर्मचारी /कामगार ३५० व ४५० कंत्राटी कामगार असे एकुण ८०० अधिकारी कामगार कार्यरत आहेत.तसेच उर्वरित २०० पैकी १५० कंत्राटी कामगारांना सदर आस्थापनेत काम करण्याचे स्वारस्य नसल्याचे व्यवस्थापनाद्वारे कथन केले आहे. व उर्वरित ५० कंत्राटी कामगारांच्या तडजोडीसाठी अप्पर कामगार आयुक्त, नागपूर कार्यालय प्रयत्नशील आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

(७६) * ३३५४४ श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ३०२०० ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आय.टी.आय.) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गत अनेक वर्षापासून केवळ रुपये चाळीस विद्यावेतन देण्यात येत असून विद्यावेतनात वाढ करण्याचा शासनस्तरावर विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या महागाईच्या काळात सदर विद्यावेतन अतिअल्प असल्याने विद्यार्थ्यांकडून विदयावेतनात वाढ करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१), (२), (३) व (४) औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील एकूण प्रशिक्षणार्थीपैकी आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या प्रशिक्षणार्थींना दरमहा रुपये ४०/- तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थींना दरमहा रुपये ६०/- याप्रमाणे विद्यावेतन देण्यात येते. सदर विद्यावेतनामध्ये वाढ करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येते हे खरे आहे. त्यानुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांचे विद्यावेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव अद्यापि शासनाच्या विचाराधिन आहे.

ठाणे जिल्ह्यातील सात महानगरपालिकांकरिता स्वतंत्र परिवहन यंत्रणा स्थापन करण्याबाबत

(७७) * ३११८३ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७५३५ ला दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील सातही महानगरपालिकांची परिवहन सेवा सुखकर होण्याच्यादृष्टीने सदर सातही महानगरपालिकांच्या परिवहन उपक्रमांतर्गत सुसूत्रता व यथायोग्य नियोजन व नियंत्रण राहण्यासाठी एकच स्वतंत्र यंत्रणा वा प्राधिकरण स्थापन करण्यात यावे अशी आग्रही मागणी शासनाकडे गत ५ वर्षांपासून ते आजतागायत करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन अधिसूचना दिनांक २५ फेब्रुवारी, २००८ नुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, मुंबई व ठाणे यांचे विलिनीकरण मुंबई महानगर क्षेत्राकरिता प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, मुंबई महानगरक्षेत्राचे गठन करण्यात आल्याचे संदर्भाधिन प्रश्नाचे उत्तरात नमूद करण्यात आले आहे तसेच सदर महानगर क्षेत्र प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामार्फत ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिकेच्या परिवहन सेवा सुधारणेबाबत गत ५ वर्षात कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे ठाणेकर जनता, प्रवासी संघटना व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याबाबत माहे डिसेंबर, २०१६ व जानेवारी, २०१७ मध्ये मा.पंतप्रधान यांना तसेच मा.मुख्यमंत्री यांचे निदर्शनास आणून कार्यवाहीची मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तुत महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाऐवजी ठाणे जिल्ह्यातील ७ महानगरपालिकांच्या परिवहन सेवावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र परिवहन यंत्रणा स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) होय.

(४) व (५) मुंबई महानगर प्रदेश परिवहन प्राधिकरण, मुंबई स्थापन करण्यात आले असून सदर प्राधिकरणाकडून ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिकांच्या परिवहन सेवांवर नियंत्रण ठेवणे अपेक्षित आहे. महानगरपालिका या स्वायत्त संस्था असल्याने त्यांच्या परिवहन सेवामध्ये सुसुत्रता राहण्यासाठी एकच स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

धरणगाव (जि.जळगाव) येथील सेवानिवृत्त विदयुत अभियंता यांचे घरात चोरी झाल्याबाबत

(७८) * **३४२२४ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरणगाव (जि.जळगाव) येथील सेवानिवृत्त विदयुत अभियंता पुष्पक नारखेडे यांच्या गणबाप्पा नगरमधील बंगल्यातून दोन अज्ञात चोरटयांनी त्यांच्या पत्नी व आईला एकटी असल्याचे पाहून चाकू व कु-हाडीचा धाक दाखवून सोने, रोख रक्कम असे एकूण साडेचार लाख ऐवज लुटला असल्याची घटना दिनांक ५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची पोलीस स्टेशनमध्ये नोंद करण्यात आली आहे काय, तसेच यासंदर्भात पोलीस तपास करुन आरोपींना अटक करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) दि.०५/०६/२०१७ रोजी दोन अज्ञात आरोपींनी एकुण ४,३९,५००/- रुपयांचा मुद्देमाल चोरल्याची घटना घडली आहे.
(२) सदर प्रकरणी दि.०५/०६/२०१७ रोजी धरणगांव पोलीस स्टेशन, भाग-५ येथे गु.र.नं.७१/२०१७ भा.दं.वि. कलम ३९२, ४४८, ३४ प्रमाणे दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध घेणे सुरु असुन सदर गुन्हा तपासावर आहे.
(३) विलंब झालेला नाही.

मुंबईतील आदिवासी पाडे मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असल्याबाबत

(७९) * **३२८३५ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानापासून ठाणे जिल्हयापर्यंत तसेच अन्य भू-भागात वसलेले आदिवासी पाडे मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी पाड्यांच्या विकासाकरिता शासनाने निधीची तरतूद केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त आदिवासी पाडयांना वीज, रस्ते, पाणी इत्यादी मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) आदिवासी पाडे पाण्यापासून वंचित अशा आशयाची बातमी माहे जून, २०१७ च्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती. ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनेसाठी मुंबई उपनगर व मुंबई शहराकरिता अनुक्रमे रु.६.२५ कोटी व रु.१.५० कोटी इतका निधी मंजूर होता.

सन २०१७-१८ मध्ये मुंबई उपनगर व मुंबई शहराकरिता अनुक्रमे रु.६.५८ कोटी व रु.१.५८ कोटी इतका नियतव्यय मंजूर आहे.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर आदिवासी पाडयांच्या विकासाकरिता सन २०१६-१७ मध्ये ३.४८ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला असून, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रु.४.५१ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पडघा (ता.भिवंडी, जि.ठाणे) जवळील बोरीवली येथे पोलिसांवर दगडफेक केल्याबाबत

(८०) * ३१३८८ श्री.नारायण राणे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील पडघ्याजवळील बोरीवली गावामध्ये कत्तलीसाठी नेण्यात येणारी ४५ जनावरे दिनांक ७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलिसांनी पकडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जनावरांची सुटका करीत असताना काही लोकांनी आक्रमक पवित्रा घेत अल्पवयीन मुले व महिलांच्या जमावाला चिथावणी देऊन पोलिसांवर दगडफेक केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) बाबत शासनाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी पडघा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १९१/२०१७ भा.दं.वि. कलम ३२५, ३५३, १४३, १४४, १४७, १४८, ३२३, ४२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ८ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ५ आरोपींना मा.न्यायालयाने अंतरिम जामिन मंजुर केला आहे. उर्वरित ०३ आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरु आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्हयातील वाढवण बंदरास स्थानिकांचा विरोध असल्याबाबत

(८१) * ३१५१६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वाढवण बंदरासाठी शासन ५००० हजार एकर समुद्र हटवणार असून पर्यावरणाचा समतोल बिघडून अनेक गावे विस्थापित होण्याची भिती व्यक्त होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाला स्थानिकांचा विरोध असून सदर प्रकल्पाचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
(२) व (३) सविस्तर प्रकल्प अहवालाचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याने प्रकल्पाचा फेरविचार करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अशासकीय आयटीआय संस्थांना अनुदान देण्याबाबत

(८२) * ३१७८७ डॉ.अपूर्व हिरे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ३०२०२ ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सन २००१ पूर्वी मान्यता दिलेल्या अशासकीय आयटीआय संस्थांना अनुदान देण्याच्या शासनाच्या तपासाधीन असलेल्या प्रस्तावावरील कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त संस्थांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, प्रस्तुत निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१), (२), (३) व (४) राज्यातील सन २००१ पूर्वी मान्यता दिलेल्या अशासकीय आयटीआय संस्थांना अनुदान देण्याचा प्रस्ताव अद्यापि शासनाच्या तपासाधिन आहे.

चौंडी (जि.अहमदनगर) येथे अवैधपणे दारु विक्री होत असल्याबाबत

(८३) * ३३५५६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौंडी (जि.अहमदनगर) येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या वाडयाभोवती असणा-या भिंतीलगत अवैध दारु विक्री होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार संबंधित पोलीस ठाण्यात वारंवार करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील अवैध दारुविक्री बंद करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
(२) जामखेड पोलीस स्टेशन येथे याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथील अपंग बालगृहाचा परिसर स्वच्छ करणेबाबत

(८४) * **३३७७१ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथे हुडको एन-११ या ठिकाणी सामाजिक न्याय विभागाच्यावतीने चालविण्यात येत असलेल्या अपंग बालगृहाच्या परिसरात मोठया प्रमाणात कचरा पसरला असल्यामुळे तेथील अपंग मुलांना डेंग्यू-मलेरिया सारखे विविध साथीच्या आजाराने ग्रासले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू परिसर स्वच्छ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
औरंगाबाद येथील हुडको एन-११ येथील शासकीय अपंग बालगृहामध्ये मागील तीन वर्षापासून प्रवेशीत विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे सदरहू बालगृह चालू वर्षापासून बंद आहे. त्यामुळे अपंग बालगृहातील मुलांना डेंग्यू व मलेरिया या साथीच्या आजाराने ग्रासलेले आहे अशी वस्तुस्थिती नाही.
(२) सदर परिसरात महानगरपालिकेमार्फत साफसफाई करण्यात येत असून घंटागाडीव्दारे कचरा जमा केला जातो असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ येथील पळसवाडी परिसरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतीबाबत

(८५) * ३४११७ श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील पळसवाडी परिसरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या ११ इमारतींच्या वसाहतीची मुदत संपलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतींची शासनाकडून कोणतीही देखभाल केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारतीची देखभाल केली जाते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

राज्यातील शासकीय अधिका-यांच्या बदल्या करून देण्याचे आश्वासन देऊन फसवणूक करणाऱ्या टोळीस पोलिसांनी अटक केल्याबाबत

(८६) * ३१०३९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयएएस, आयपीएस सह बडया शासकीय अधिका-यांच्या बदल्या करून देतो असे सांगून फसवणूक करणारी एक टोळी मुंबई गुन्हे अन्वेषण विभागाने दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विमानतळाजवळील एका पंचतारांकित हॉटेलवर मुंबई पोलीस दलाचे सहआयुक्त (गुन्हे) यांनी छापा घालून हिरमुखे आणि इतर तिघांना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी सहायक पोलीस आयुक्त (डी-१/प), गुन्हे शाखा, मुंबई यांच्या अधिपत्याखाली छापा घालून कारवाई केली आहे.
(३) सदर प्रकरणी विमानतळ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २६/१७ भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १७०, १२० (ब) सह कलम ६६ (ड) आय.टी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्हा गुन्हे प्रकटीकरण शाखेकडे (गु.प्र.शा.गु.र.क्र. २४/१७) वर्ग करण्यात आलेला आहे.

नमूद गुन्ह्यात ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगांमधील कामगार कपात केल्याबाबत

(८७) * ३१२१४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील (आयटी) उद्योगांमध्ये सुमारे अडीच लाख कामगार नोकरीस असून या उद्योगात कामगार कपात करण्यास सुरुवात करण्यात आली असल्याने पुढील काही काळात सुमारे पंधरा ते वीस हजार कामगारांना नोकरी गमविण्याची स्थिती निर्माण झाली असून ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार पुणे येथील सदर उद्योगांमधील कामगार बेरोजगार होवू नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) फोरम फॉर आयटी एम्प्लाईज (एफ.आय.टी.ई.) या संघटनेद्वारे माहिती तंत्रज्ञान क्षेत्राततील (आय.टी) कामगार कपात होत असल्याबाबतची तक्रार कामगार आयुक्त, मुंबई या कार्यालयास माहे मे, २०१७ मध्ये प्राप्त झालेली आहे.

(२) पुणे जिल्हयातील प्रामुख्याने हिंजेवाडी (ता.मुळशी), हडपसर (ता.हवेली) व तळवडे (ता.हवेली) येथील माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात ९२० एवढया आस्थापना कार्यरत असून १,६२,००० एवढे कर्मचारी कार्यरत आहेत.

यासंदर्भात फोरम फॉर आयटी एम्प्लाईज (एफ.आय.टी.ई.) या संघटनेकडून मे, २०१७ मध्ये एकूण ३९ आय.टी कर्मचा-यांबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी १५ कर्मचा-यांनी त्यांना दबाव टाकून राजीनामा मागत असल्याचे कथन केले असून उर्वरित २४ कर्मचाऱ्यांकडून बेकायदेशिरपणे राजीनामा घेतला असल्याचे नमुद केले आहे.यासंदर्भात व्यवस्थापनाने बळजबरीने कोणत्याही कर्मचा-यावर दबाब आणून त्यांचा राजीनामा घेवू नये व अनुचित कामगार प्रथेचा अवलंब करु नये अशी समज व्यवस्थापनास चर्चेदरम्यान कामगार आयुक्त कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

ज्या कर्मचा-यांवर व्यवस्थापनाने बळजबरीने दबाब आणून राजीनामा घेतलेला आहे अथवा राजीनामा देण्यास भाग पाडत आहेत अशा व्यवस्थापनाविरोधात योग्य त्या प्राधिकरणाकडे रितसर कायदेशीर दाद मागण्याबाबत कर्मचारी संघटनेस चर्चेद्वारे सल्ला देण्यात येवून कायदेशीर तरतुदीबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

मे, २०१७ ते आजतागायत पुणे येथील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एकुण १३ कर्मचा-यांनी बेकायदेशिरपणे कामावरुन कमी केल्याबाबत औद्योगिक विवाद अधिनियम,१९४७ कलम २-अ अंतर्गत क्षेत्रिय कार्यालयाकडे विवाद उपस्थित केला आहे. याप्रकरणी पुढील सुनावणी दिनांक ०१/०८/२०१७ रोजी ठेवण्यात आली असुन पुढील समेटाची प्रक्रिया क्षेत्रिय कार्यालयामार्फत सुरु आहे.

फोरम फॉर आयटी एम्प्लाईज (एफ.आय.टी.ई.) ही संघटना तसेच पुणे जिल्हयातील प्रमुख आय.टी आस्थापनेची संयुक्त बैठक आयोजित करण्यात येवून उभयतांमध्ये औद्योगिक शांतता अबाधित ठेवण्यासाठी क्षेत्रिय कार्यालय प्रयत्नशील आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) धरणाच्या धबधब्याच्या प्रवाहात केमिकलयुक्त गोण्या आढळून आल्याबाबत

(८८) * ३३८०४ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) धरणाच्या धबधब्याच्या प्रवाहात माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान ४८ टन केमिकलयुक्त २०० गोण्या आढळून आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरण क्षेत्रातील केमिकलयुक्त गोण्यांमुळे लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याने शिवाजीनगर पोलीस ठाणे, अंबरनाथ येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाणे, उल्हासनगर येथे गु.र.क्र.१७४/१७ भा.दं.वि.कलम ३३६ अन्वये ३ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) नगरपरिषद बरखास्त करण्याबाबत

(८९) * ३०९३४ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील नगरपरिषद बरखास्त करण्यासंदर्भातील मागणीचे एक स्मरणपत्र निवेदन श्रमजीवी संघटनेने दिनांक ९ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री तसेच सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेतील नगराध्यक्षांसह १० नगरसेवकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केली असल्याबाबत तेथील नागरिकांनी, समर्थन संस्थेने तसेच श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा माजी लोकप्रतिनिधी यांनी

मा.मुख्यमंत्री, सचिव, नगरविकास विभाग यांना माहे फेब्रुवारी, मार्च व मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदने व सविस्तर कागदपत्राचे पुरावे सादर करूनही जिल्हाधिकारी, नाशिक तसेच मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून दोषींवर कारवाई करून नगरपरिषद बरखास्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय. या आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर निवेदनामध्ये त्रिंबक नगरपरिषदेच्या ११ नगरपरिषद सदस्यांचा अतिक्रमणात सहभाग असल्याचे नमूद आहे.

त्यापैकी ४ नगरपरिषद सदस्यांची आढळून आलेली अतिक्रमणे त्रिंबक नगरपरिषदने काढली आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ४४ (१-ई) नुसार संबधित नगरपरिषद सदस्य यांचेविरुध्द जिल्हाधिकारी, नाशिक यांचे स्तरावर कारवाई प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मानवत (जि.परभणी) येथील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाबाबत

(९०) * ३३८८२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २७८३५ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत (जि.परभणी) येथील गावठाण (कबाला) या सुमारे २०० कोटी रूपयांचे मुल्य असणाऱ्या शासकीय जमिनीवर झालेले अतिक्रमण हटवून जागा शासनाला परत मिळावी यासाठी जिल्हाधिकारी, परभणी यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद मानवत व उपअधिक्षक भुमि अभिलेख, मानवत यांना सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आदेशित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सुस्पष्ट अहवाल एक महिन्यात सादर करावा असे आदेश कक्ष अधिकारी, नगरविकास नवि-१७ यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांना माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या व श्री.हरिप्रसाद काबरा यांच्या अर्जाच्या अनुषंगाने मानवत नगरपरिषदेने सन २०१२ मध्ये श्री.हरिप्रसाद काबरा यांचे नावे घर क्र.१-७-१० वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबतची नोंद मालमत्ता पत्रकावर घेतली.

सदर मालमत्ता हस्तांतरणाच्या नोंदी संदर्भात श्री. शेख जावेद अब्दुल सत्तार यांनी दि.१६/०९/२०१३ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३०८ नुसार जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे अपील दाखल केले असून सदर अपील प्रलंबित आहे.

सदर प्रकरणी दि.१२/०३/२०१५ व दि.२९/०६/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी, नगरपरिषद मानवत यांना मा.उच्च न्यायालयाच्या Division Bench कडे जागेच्या मालकी हक्काबाबत याचिका दाखल करण्याचे परभणी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सूचित केले आहे.

तथापि, नगरपरिषदेच्या विधी सल्लागाराचे अभिप्रायाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही बाबत मानवत नगरपरिषदेने जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे प्रकरण मार्गदर्शनार्थ सादर केले आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी सुस्पष्ट अहवाल एक महिन्यात सादर करण्यास जिल्हाधिकारी, परभणी यांना शासन पत्र दिनांक ३ मार्च, २०१७ अन्वये सूचित केले आहे.

(३) व (४) त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांनी दि.१४ मार्च २०१७ अन्वये उप विभागीय अधिकारी, पाथरी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली.

सदर समितीने दिनांक २९ जून, २०१७ रोजी जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे अहवाल सादर केला असून त्यांचे कार्यालय स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

विधान भवन :
मुंबई.

उत्तमसिंग चव्हाण
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.